दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक

• वर्ष : ०४ • अंक : ०५४ • पुणे • बुधवार, दि. ०४ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313



७५ लाखांच्या सुशोभीकरण कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

3



अनाकलनीय : मुख्यालयाबाहेर पोलिसांचे आंदोलन

4

ठळक बातम्या

हायकोर्ट रोडवर टोळक्याचा हल्ला

छत्रपती संभाजीनगर (आरंभ पर्व) : कॅनॉट प्लेस येथून मोमोज खाऊन घरी परतणाऱ्या कुटुंबाची कार रस्त्यात अडवून दुचाकीवरील टोळक्याने मारहाण केली. हल्लेखोरांनी बाटली फेकून कारची काच फोडली आणि १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीची कॉलर पकडून तिला गाडीबाहेर ओढले. रविवारी (१ नोव्हेंबर) रात्री सव्वानऊ वाजेच्या सुमारास हायकोर्ट ते हनुमाननगर रस्त्यावर हा प्रकार घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुंडलिकनगर परिसरात राहणारी १७ वर्षांची फिर्यादी मुलगी, तिचे वडील आणि भाऊ हे रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास कॅनॉट येथे गेले होते. तेथून हायकोर्टाकडून हनुमाननगरच्या दिशेने जात असताना २ दुचाकींवरून आलेल्या ४ ते ५ जणांनी कारच्या समोर दुचाकी आडवी लावली. हल्ल्यादरम्यान टोळक्यातील इतर तरुण त्यांच्यातील एकाला 'शरद... शरद...' अशी हाक मारत होते, अशी माहिती फिर्यादीने दिली आहे. घटनेनंतर भयभीत झालेल्या कुटुंबाने पुंडलिकनगर ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी सोमवारी रात्री गुन्हा नोंदवला. पोलिस या भागातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत.

९ जागा जिंकून भाजप मोठा भाऊ

सातारा/सांगली (आरंभ पर्व) : सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सत्तासमीकरणांना कलाटणी मिळाली आहे. २१ जागांच्या संचालक मंडळात भारतीय जनता पक्षाने ९ जागा जिंकत बँकेतील सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान पटकावला आहे. शिवसेनेने ४, तर राष्ट्रवादी काँग्रेसने ८ जागा जिंकल्या आहेत. भाजप व शिवसेना मिळून महायुतीकडे १३ जागांचे स्पष्ट बहुमत असले तरी अध्यक्षपदावरून अंतर्गत रस्सीखेच सुरू झाली आहे.

राष्ट्रवादीत अंतर्गत नाराजी उफाळली

पक्षसंघटन कमजोर होत असल्याची आमदारांची भावना

मुंबई (दै. आरंभ पर्व)

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात अंतर्गत नाराजी उफाळून आली असून पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमधील संघर्षाचा फटका संघटनात्मक पातळीवर बसत असल्याची भावना आमदारांनी व्यक्त केली.

वरिष्ठ नेत्यांमधील वादाच्या बातम्या सातत्याने समोर येत असल्या, तरी त्यामागील नेमक्या घडामोडींबाबत आमच्यापर्यंत कोणतीही माहिती पोहोचत नाही, अशी खंत काही आमदारांनी व्यक्त केली.

अजित पवार गटाच्या वरिष्ठ नेत्यांच्या अंतर्गत संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या सर्व मंत्री, आमदार, खासदारांची मंगळवारी बैठक बोलावली होती. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील



यांच्यासह ३५ च्या आसपास आमदार, खासदार या बैठकीला उपस्थित होते.

बैठकीत पक्षबांधणीसह राज्यातील भीषण दुष्काळाच्या परिस्थितीवर चर्चा झाली. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आमदारांना दुष्काळी भागांचे दौरे करण्याच्या सूचना दिल्या. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना शासकीय पातळीवर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार अनिल पाटील यांनी अर्थ खाते पुन्हा मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी केली. महायुतीतील घटक मित्रपक्षांकडून सहकार्य मिळत नसल्याच्या तक्रारीही अनेक आमदारांनी केल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे असलेल्या खात्यांमध्ये तसेच त्यांच्या मंत्र्यांकडून कामे होत नसल्याची नाराजी बहुतांश आमदारांनी व्यक्त केली. सत्तेत सहभागी असूनही आमदारांची कामे होत नसतील, तर त्याचा परिणाम संघटनात्मक ताकदीवर होईल. कामे मार्गी लागत नसल्याने मतदारसंघात उत्तर देणे कठीण होत असल्याचेही आमदारांनी सांगितले. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत या विषयांवर चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल, असे तटकरे यांनी स्पष्ट केले.



वृंदावनच्या कथावाचकाविरोधात लैंगिक शोषणाची तक्रार

तृप्ती देसाई यांची अटकेची मागणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

वृंदावन येथील कथावाचक इंद्रदेव महाराज यांच्याविरोधात एका भक्त महिलेने लैंगिक शोषणाची तक्रार दिली असून, मीरा-भाईंदर येथील काशीमीरा पोलीस ठाण्यात झिरो एफआयआर दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित कथावाचकाला तातडीने अटक करावी, अशी मागणी भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत केली आहे.

तक्रारदार महिला गेल्या आठ महिन्यांपासून न्याय मिळवण्यासाठी प्रयत्न करत होती. मात्र, तिच्या तक्रारीची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. अखेर देसाई यांनी या प्रकरणात हस्तक्षेप केल्यानंतर गुन्हा दाखल झाल्याचे सांगण्यात आले. भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ६९, ७५, ७९ आणि ३५१ (२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारीनुसार, महिलेने समाजमाध्यमांवर कथावाचकाची प्रवचने पाहिल्यानंतर २०२३ मध्ये मुंबईतील एका सत्संग कार्यक्रमाला हजेरी लावली होती. त्यानंतर ती वृंदावन येथील आश्रमातही गेली होती. पुढील काळात आपल्या दैनंदिन जीवनातील अडचणी कथावाचकाला सांगितल्याचेही महिलेने तक्रारीत नमूद केले आहे. आश्रमात बळजबरीने शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप महिलेने केला आहे. तसेच व्हिडिओ कॉलद्वारे अश्लील वर्तन केल्याचा आणि फोनवरून धमकी दिल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणाची माहिती देण्यासाठी देसाई यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेतली. तक्रारदार महिलेसह कथावाचकाकडून कथित शोषण झाल्याचा आरोप करणाऱ्या अन्य काही महिलाही यावेळी उपस्थित होत्या त्यांनी आपले अनुभव यावेळी मांडले. धार्मिक प्रवचन आणि भक्तीच्या नावाखाली महिलांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेतला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. संबंधित कथावाचकाकडून कोणत्याही महिलेवर अन्याय झाला असल्यास तिने निर्भयपणे पुढे येऊन तक्रार नोंदवावी, असे आवाहन देसाई यांनी केले आहे.या प्रकरणातील अन्य संभाव्य तक्रारदारांचे जबाब नोंदवून सर्व आरोपांची सखोल चौकशी करावी, अशी मागणीही भूमाता ब्रिगेडने केली आहे.



- अन्य महिलाही पुढे येणार असल्याचा दावा

दोन वाहनांवर ६-७ जणांची दगडफेक

- नागपूर-वाशिमला जात होती वाहने, पोलिस पोहोचेपर्यंत आरोपी पसार

छत्रपती संभाजीनगर (दै. आरंभ पर्व)

छत्रपती संभाजीनगर हद्दीत समृद्धी महामार्गावर करमाड परिसरात रविवारी (दि.०१) रात्री १० वाजेच्या सुमारास एर्टिगा (एमएच २० जीई २१६२) आणि हायवा ट्रक (एमएच ४० सीडी ५७३५) या दोन वाहनांवर दगडफेकीची घटना समोर आली आहे. दोन्ही वाहने नागपूर-वाशिमच्या दिशेने जात होता. या प्रकरणी कारचे मालक परमेश्वर पंजरकर (४२, रा.नक्षत्रवाडी, संभाजीनगर) यांच्या फिर्यादीनुसार करमाड पोलिस ठाण्यात मंगळवारी (दि.०२) अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला. दरोडा व लूटमारीच्या घटना रोखण्यासाठी ८ पोलिस वाहने नियमित गस्त घालत आहेत. असे असतानाही वाहनांवरील हल्ल्याच्या घटना थांबलेल्या नाहीत. समृद्धी महामार्गावर सोमवारी पिस्तूल व चाकूचा धाक दाखवत मुंबईकडे जाणारी इनोव्हा कार व कारमधील अभियंत्याचे पैसे लुटल्याची घटना सोमवारी घडली होती. त्याच्या आदल्या दिवशी रविवारीही समृद्धीवर वाहनावर दगडफेक केल्याची घटना घडल्याची धक्कादायक बाब मंगळवारी उघडकीस आली. पोलिस घटनास्थळी येईपर्यंत दगडफेक करणारे आरोपी पसार



> मी कारने वाशिमला ताशी १०० किमीच्या वेगाने जात होते. अचानक करमाड जवळ ६-७ लोकांनी दगड फेकले. यात कारची काच फुटली. तरीही मी न थांबता जालना इंटरचेंजवर पोहोचलो, तेथे पोलिसांना कॉल केला.
> **- परमेश्वर पंजरकर, कार मालक**

झाल्याची माहिती महामार्ग पोलिस अधीक्षक रुपाली दरेकर यांनी दिली. या महामार्गावर पोलिसांच्या ८ गड्यांची नियमित गस्त असताना ही घटना घडली.

समृद्धी महामार्गावर एआय आधारित कॅमेरे बसवण्याचे काम सुरू आहे. ऑक्टोबर महिन्यात पहिल्या टप्प्यात हे कॅमेरे कार्यान्वित करण्याचे नियोजन होते. मात्र, अद्याप या कामाला अपेक्षित गती मिळालेली नाही. त्यामुळे निर्धारित डेडलाइन हुकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

निवडणूक आयोगाचे सर्व राज्यांना पत्र

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

निवडणूक आयोगाने मंगळवारी स्पष्ट केले की, एसआयआरच्या ड्राफ्ट मतदार यादीत नाव नसल्यास जुने मतदारही फॉर्म-६ भरू शकतात. यामुळे ते पुन्हा नाव जोडण्यासाठी अर्ज करू शकतील. आधीपासून मतदार असल्याने याला खोटी घोषणा मानले जाणार नाही आणि केवळ त्या आधारे लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम ३१ अंतर्गत कारवाई केली जाणार नाही. वास्तविक, फॉर्म-६ मध्ये घोषणा करावी लागते की अर्जदार पहिल्यांदाच मतदार बनत आहे. अशा वेळी जुने मतदार खटल्याच्या भीतीने फॉर्म भरत नव्हते. आयोगाने म्हटले की, अर्ज करणाऱ्याचे नाव कोणत्याही दुसऱ्या मतदारसंघात नोंदलेले नसावे. बाकी माहितीही अचूक असावी.

प्रदीप पूर्णेकर प्रकरणात तपास सुरूच

विरोधकांकडून प्रकरण चिघळवण्याचा प्रयत्न, संजय शिरसाटांचा आरोप

छत्रपती संभाजीनगर (दै. आरंभ पर्व)

प्रदीप पूर्णेकर प्रकरणावरून सध्या राजकीय वातावरण तापले असून, या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मंत्री संजय शिरसाट यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास त्यांच्या पद्धतीने सुरू आहे. मात्र, विरोधक जाणीवपूर्वक या प्रकरणाला राजकीय रंग देत ते अधिक चिघळवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप शिरसाट यांनी केला. कोणताही आरोपी असो, तो कोणत्याही पक्षाचा असला तरी त्याच्यावर योग्य ती कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. पूर्णिमा हत्याकांड प्रकरणात विरोधकांकडून घेतल्या जाणाऱ्या भूमिकेवरही शिरसाट यांनी नाराजी व्यक्त केली. या प्रकरणात विरोधकांकडून जाणीवपूर्वक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव घेण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे ते म्हणाले. पोलिसांनी या प्रकरणाचा निष्पक्षपणे तपास करावा, अशी भूमिका स्वतः मुख्यमंत्र्यांनीही मांडली आहे. मुख्यमंत्र्यांनी पोलिसांना त्यांच्या पद्धतीने तपास करण्यास सांगितले असताना विरोधकांकडून वारंवार या प्रकरणाचा राजकीय मुद्दा



केला जात असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. पूर्णिमा हत्याकांड प्रकरणात नेमके काय घडले, याचा तपास पोलीस करत आहेत. या तपासात कोणाचाही हस्तक्षेप नसावा. विरोधकांना खरोखरच पूर्णिमाच्या हत्येबद्दल दुःख असेल, तर त्यांनी पोलिसांना सहकार्य करावे. तपास कुठपर्यंत पोहोचला आहे, याची माहिती घ्यावी; मात्र या प्रकरणाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करू नये, असे शिरसाट म्हणाले. या प्रकरणात जो कोणी आरोपी असेल, त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. आरोपी कोणत्या पक्षाचा आहे, याचा विचार न करता कायद्यानुसार कारवाई होणे आवश्यक आहे. असे सर्वांचे मत असताना विरोधकांकडून या प्रकरणावरून राजकारण का केले जात आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडी आणि पक्षात फूट पडण्याच्या चर्चांवरही संजय शिरसाट यांना प्रश्न विचारण्यात आला. राष्ट्रवादीचे दोन गट आणि त्यातील काही नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची घेतलेली भेट यामुळे राजकीय वर्तुळात संभ्रम निर्माण झाल्याचे ते म्हणाले. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेमके काय सुरू आहे, याची अधिकृत माहिती आपल्याकडे नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा संभ्रम दूर करण्यासाठी अजित पवार गटातील वरिष्ठ नेत्यांनी आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. त्यांच्या पक्षात फूट पडणार की नाही, यावर आपण भाष्य करणार नसल्याचेही शिरसाट यांनी सांगितले. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या मदतीबाबत बोलताना शिरसाट यांनी सरकारकडून मदत दिली जात असल्याचे सांगितले. सरकारने शेतकऱ्यांच्या खात्यात 5 हजार रुपये जमा करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, 305 पेक्षा अधिक तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर FDA ची धडक कारवाई

कोट्यवधी रुपयांचा अन्नसाठा जप्त, ठाण्यात १० जणांना अटक

मुंबई (दै. आरंभ पर्व)

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाची राज्यभर धडक कारवाई सुरु आहे. अनेक ठिकाणी कोट्यवधी रुपयांचा अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसात 45 लाख रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. 5 आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून 3 एफ.आय. आर. दाखल झाले आहेत. तर 2 जणांना अटक तर 2 वाहने जप्त करण्यात आली असून 2 आस्थापना सील करण्यात आली आहे.

दिनांक 1 ते 3 नोव्हेंबर 2026 दरम्यान राज्यभर विशेष तपासणी मोहीमः प्रतिबंधित अन्नपदार्थांसह एकूण 45 लाखांचा अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे. कोकण व नाशिक विभागात प्रतिबंधित अन्नपदार्थांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. 11.55 लाखांचा प्रतिबंधित साठा व 2 वाहने जप्त; 3 एफ.आय. आर. दाखल, 2 जणांना अटक, २ आस्थापना सील करण्यात आली आहे.



चेंबूर, मुंबई येथे लक्झरी बसमधून अस्वच्छ परिस्थितीत वाहतूक होणारा 11.11 लाख किमतीचा 1 हजार 2 किलो स्वीट हलवा व मिठाईचा साठा जप्त करण्यात आला आहे.

सात विभागांत मिठाई, खवा, फरसाण, खाद्यतेल, सुका मेवा आदी 22.34 लाख किमतीचा अन्नसाठा जप्त केला आहे. हॉटेल्स, मिठाई दुकाने व उत्पादक आस्थापनांवर कारवाई करण्यात आली आहे. 5 आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तर 1 आस्थापनेस व्यवसाय बंद ठेवण्याची नोटीस देण्यात आली आहे, सणासुदीच्या कालावधीत नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार व भेसळमुक्त अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, तसेच प्रतिबंधित अन्नपदार्थांची विक्री, साठवणूक व वितरण रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत दिनांक 1 नोव्हेंबर 2026 ते 3 नोव्हेंबर 2026 या कालावधीत राज्यभर विशेष तपासणी व धडक कारवाई मोहीम राबविण्यात आली. यामध्ये कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर विभागातील कारवाईचा समावेश आहे.

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर दारूची वाढती मागणी लक्षात घेऊन ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. तस्करांचे मनसुबे उधळून लावत विभागाने विविध ठिकाणी छापे टाकत तब्बल 85 लाख रुपयांचा अवैध मद्य आणि परराज्यातील कर चुकवलेला मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच या प्रकरणी 10 जणांना अटक करण्यात आली असून 7 गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सणासुदीच्या काळात ग्राहकांची फसवणूक होऊ नये आणि आरोग्याला धोका निर्माण होऊ नये म्हणून उत्पादन शुल्क विभागाचे पथक अधिक सतर्क झाले असून, नागरिकांनी अनधिकृत ठिकाणांवरून स्वस्त दरात मिळणारे मद्य खरेदी करू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

स्त्री समानता : केवळ घोषणांमध्ये नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून दिसू द्या!

स्त्री समानतेचा विषय आजही समाजासमोर एक महत्त्वाचे आव्हान म्हणून उभा आहे. एकविसाव्या शतकात भारताने विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग, क्रीडा, राजकारण आणि अंतराळ संशोधन अशा अनेक क्षेत्रांत मोठी झेप घेतली आहे. महिला प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. मात्र, या प्रगतीच्या झगमगाटामागे स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न आजही पूर्णपणे सुटलेला नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.



आज मुलगी शिकली पाहिजे, स्वतःच्या पायावर उभी राहिली पाहिजे, तिने मोठी स्वप्ने पाहिली पाहिजेत, असे प्रत्येक व्यासपीठावर सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव अनेक कुटुंबांमध्ये आजही कायम आहे. मुलाच्या शिक्षणासाठी मोठा खर्च करण्याची तयारी असते; मात्र मुलीच्या शिक्षणाच्या वेळी अनेकदा आर्थिक मर्यादांचे कारण पुढे केले जाते. मुलाला स्वातंत्र्य आणि मुलीला बंधने, मुलाला निर्णय घेण्याचा अधिकार आणि मुलीला केवळ परिस्थितीशी जुळवून घेण्याची अपेक्षा, ही मानसिकता बदलल्याशिवाय समानतेचा खरा अर्थ साध्य होणार नाही.

स्त्री समानता म्हणजे पुरुषांशी स्पर्धा करणे नव्हे, तर स्त्रीलाही पुरुषांइतकाच सन्मान, स्वातंत्र्य, संधी आणि अधिकार मिळणे होय. घरातील निर्णयप्रक्रियेपासून ते देशाच्या धोरणनिर्मितीपर्यंत महिलांचा सहभाग समान असणे आवश्यक आहे. महिलांनी नोकरी करावी, व्यवसाय करावा, राजकारणात सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करताना घर आणि कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी केवळ तिच्यावरच टाकणे, हा देखील एक प्रकारचा अन्यायच आहे.

आजही महिलांना सुरक्षिततेच्या प्रश्नाला सामोरे जावे लागते. सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी, प्रवासात आणि कधीकधी स्वतःच्या घरातही त्यांना असुरक्षिततेची भावना सहन करावी लागते. महिलांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे असणे आवश्यक आहेच; पण त्याचबरोबर समाजाच्या मानसिकतेत परिवर्तन होणे अधिक महत्त्वाचे आहे. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला, तरच तिच्या स्वातंत्र्याला खऱ्या अर्थाने संरक्षण मिळेल.

राजकारणात महिलांना आरक्षण, शिक्षणात समान संधी, नोकरीत समान वेतन आणि मालमत्तेतील समान अधिकार यांसारख्या तरतुदी महत्त्वाच्या आहेत. मात्र, केवळ कायदे करून सामाजिक समानता निर्माण होत नाही. त्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाची सकारात्मक मानसिकता तितकीच आवश्यक आहे. महिलांना संधी दिली तर त्या नेतृत्व करू शकतात, निर्णय घेऊ शकतात आणि समाजाच्या विकासाला नवी दिशा देऊ शकतात, हे अनेक महिलांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे.

स्त्री ही केवळ आई, बहीण, पत्नी किंवा मुलगी अशा नात्यांपुरती मर्यादित नाही. ती स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तिच्या इच्छा, आकांक्षा, विचार आणि स्वप्नांना स्वतःचे महत्त्व आहे. तिच्या आयुष्याचे निर्णय घेण्याचा अधिकार तिलाही असला पाहिजे. तिच्या कपड्यांवर, शिक्षणावर, करिअरवर आणि जीवनशैलीवर अनावश्यक बंधने घालण्यापेक्षा तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याची गरज आहे.

स्त्री समानतेची सुरुवात घरापासून झाली पाहिजे. मुलगा आणि मुलगी यांना समान वागणूक, समान शिक्षण आणि समान संधी देण्याची जबाबदारी प्रत्येक पालकाने स्वीकारली पाहिजे. घरातील कामे ही केवळ महिलांची जबाबदारी नसून ती कुटुंबातील प्रत्येक सदस्याची सामूहिक जबाबदारी आहे, ही जाणीव मुलांमध्ये लहानपणापासून रुजवली पाहिजे.

समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ उंच इमारती, महामार्ग, आर्थिक विकास किंवा तंत्रज्ञानाच्या प्रगतीवरून करता येणार नाही. त्या समाजातील महिलांना किती सन्मान, सुरक्षितता, स्वातंत्र्य आणि समान संधी मिळतात, यावरूनही त्या समाजाची खरी प्रगल्भता ठरते.

आज गरज आहे ती स्त्री समानतेच्या घोषणा देण्याची नव्हे, तर त्या प्रत्यक्ष जीवनात उतरवण्याची. महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन, व्यासपीठावर स्त्रीशक्तीचा गौरव करून किंवा भाषणांत समानतेचे गोडवे गाऊन समाज बदलणार नाही. महिलांच्या अधिकारांचा सन्मान प्रत्येक दिवसाच्या आचरणातून दिसला पाहिजे.

कारण स्त्री सक्षम झाली, तर कुटुंब सक्षम होते; कुटुंब सक्षम झाले, तर समाज सक्षम होतो आणि समाज सक्षम झाला, तरच राष्ट्राची खरी प्रगती होते. स्त्रीला समानतेचा अधिकार देणे ही तिच्यावर केलेली कृपा नसून तो तिचा मूलभूत हक्क आहे. आता हा हक्क मान्य करण्यापुरते न थांबता तो प्रत्यक्षात जगण्याची वेळ आली आहे!

कातकरी कुटुंबाची दिवाळी गोड

रंगारी बदक चाळ रहिवाशी संघ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा उपक्रम



जुन्नर (दै. आरंभ पर्व)

रंगारी बदक चाळ रहिवाशी संघ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने कबाडवाडी ता.जुन्नर येथे रविवारी दि. ०१ नोव्हेंबर रोजी कातकरी वस्तीतील कुटुंबांना दिवाळी फराळ साहित्य व जीवनावश्यक वस्तुंचे वाटप करण्यात आले यामुळे कष्टकरी गरजू कातकरी समाजाची दिवाळी गोड झाली. गणेश उत्सवाचे मंडळाचे यंदाचे ८७ वे वर्ष आहे. उत्सव साजरा करून सामाजिक बांधीलकी जपत मंडळाचे वतीने दरवर्षी सामाजिक उपक्रम राबविले जातात. यावेळी मंडळाचे अध्यक्ष मंगेश पिंपरकर,कार्याध्यक्ष रोहन सावंत, सरचिटणीस राकेश जेजूरकर, खजिनदार शंकर साळवी, साहको विश्वस्त अनिल धाडगांवकर, उपाध्यक्ष सुनिल धाडगांवकर, केशव परब, विनोद मकवाना, प्रमोद साळवी,सजय येरम,अमित जाधव, तसेच पाडळी ग्रामपंचायत सरपंच स्वाती कबाडी, जुन्नरच्या नगरसेविका अंजली शिंदे, पुणे जिल्हा व्यापारी असोशिएशनचे कार्याध्यक्ष सुनिल शिंदे व सामाजिक कार्यकर्त संजय ढोबळे तसेच कातकरी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनिल गाडेगावकर विश्वस्थ नागरिकांना दिवाळी फराळाबरोबर साडी,टॉवेल,ब्लँकेट आदींचे वाटप करण्यात आले. यामुळे त्यांचा दिवाळी सणाचा आनंद द्विगुणित झाला. समाजाचे वतीने दगडु वाघ यांनी आभार मानले.

थोडक्यात पण महत्वाचे



सराईत गुन्हेगारास लक्ष्मीनगर पोलिसांकडून अटक

पुणे (आरंभ पर्व) : सराईत गुन्ह्यात पाहिजे असकेल्या गुन्हेगारास अटक करण्यात लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनमधील तपास पथकास अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी निखिल मधुकर कांबळे (वय २२वर्षे, रा. गाडीतळ येरवडा पुणे)असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सदर गुन्हेगारांवर लक्ष्मीनगर, येरवडा पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल असून तो अनेक महिन्यापासून पोलिसांना गुंगारा देत होता. मात्र आज संबंधित गुन्हेगार हा तिच्या मैत्रिणीस भेटण्यासाठी गाडीतळ येथे येणार असल्याची माहिती लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज नांद्रे यांना समजताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने परिसरात सापळा रचला होता. मात्र याची माहिती सदरील गुन्हेगारास समजताच तो पळून जाण्याच्या तयारीत असताना तपास पथकातील पोलिस अधिकारी व कर्मचारी यांनी त्याचा पाठलाग व सापळा रचून त्यास अटक करण्यात यश आले. सदरची यशस्वी कामगिरी ही पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहायक पोलिस आयुक्त संजय दराडे, पूर्व विभागाचे अप्पर पोलिस आयुक्त मनोज पाटील, परिमंडळ ४चे पोलिस उपआयुक्त रजनीकांत चिलुमुला, येरवडा विभागाचे सहायक पोलिस आयुक्त सुनील जैतापूरकर, येरवडा विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज नांद्रे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमर कदम, दिलीपकुमार वेडे, सहायक पोलिस निरीक्षक निखिल पवार, दत्तात्रय लिंगाडे, यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे मयूर सूर्यवंशी, गणेश लोखंडे, किरण भागीत, भीमराव कांबळे, अक्षय शिंदे, राहुल परदेशी, श्रीनाथ कांबळे, सूरज ओबासे, अमोल वायाळ, नितीन धायगुडे, कादिर शेख, दत्तात्रय शिंदे, सचिन कुचेकर या तपास पथकाने सदरची यशस्वी कामगिरी केली.



सफाई कामगारांची दिवाळी गोड

उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)

समाजातील प्रत्येक घटकाचा सण आनंदात साजरा व्हावा, या सामाजिक बांधिलकीतून माहिती सेवा समिती आणि भारतीय जैन संघटना (BJS) यांच्या संयुक्त विद्यमाने सफाई कामगारांसाठी दिवाळी फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत १०० पेक्षा जास्त सफाई कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप करून त्यांची दिवाळी गोड करण्यात आली. माहिती सेवा समितीच्या हवेली तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी गेल्या सात वर्षांपासून सांभाळणारे कमलेश कैलास बहिरट यांच्या पुढाकारातून हा उपक्रम दरवर्षी सातत्याने राबविण्यात येत आहे. शहर आणि गाव स्वच्छ ठेवण्यासाठी सफाई कामगार दररोज घरोघरी जाऊन कचरा जमा करतात. नागरिकांच्या आरोग्याची आणि परिसराच्या स्वच्छतेची जबाबदारी पार पाडताना हे कामगार अनेकदा सण-उत्सवाच्या काळातही आपले कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या श्रमाचा सन्मान व्हावा, त्यांनाही दिवाळीचा आनंद घेता यावा आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या भावनेतून दरवर्षी मिठाई व दिवाळी फराळ वाटप करण्यात येते. या कार्यक्रमाला माहिती सेवा समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष चंद्रकांत गोविंद वारघडे, हवेली तालुका अध्यक्ष कमलेश कैलास बहिरट, भारतीय जैन संघटनेचे वाघोली प्रकल्प व्यवस्थापक बापूसाहेब साळुंके (सर), उपप्राचार्य गेठे पी.पी., पर्यवेक्षक पवार पी.आर., पत्रकार ज्ञानेश्वर पाटेकर, उद्योजक गणेश कटके, तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होता. यावेळी प्रा.अंधारे व्ही.एम., प्रा. सोनवणे पी.एन., प्रा. क्षीरसागर जी.व्ही., प्रा. ढोकले बी.आर., प्रा. पासलकर एस.बी., प्रा. निकम सर, शहा सर, शिवाजी मोघे सर, जय जगताप, स्वप्निल काशीद, पौर्णिमा मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. सामाजिक बांधिलकीतून विविध उपक्रम माहिती सेवा समितीच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण, पर्यावरण रक्षण, तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याबरोबरच स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कार्याचा सन्मान करण्याची परंपराही समितीने जपली आहे.

बारामती आरटीओची 'MH42BZ' मालिका लवकरच सुरू होणार

- **आकर्षक क्रमांक आरक्षित करण्याची संधी!**
- **पसंतीचे वाहन क्रमांक मिळविण्यासाठी नागरिकांनी अर्ज सादर करावेत**
- **बारामती, दौंड आणि इंदापूर तालुक्यातील नागरिकांना आवाहन**



नवीन 'MH42BZ' मालिकेच्या प्रारंभामुळे बारामती, दौंड आणि इंदापूर परिसरातील दुचाकीधारकांना आपल्या आवडीचा वाहन क्रमांक निवडण्याची संधी उपलब्ध होणार असून, इच्छुक नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे.

बारामती-सोमनाथ साळुंके (दै. आरंभ पर्व)

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती अंतर्गत खाजगी दुचाकी संवर्गातील वाहनांसाठी लवकरच नवीन वाहन नोंदणी क्रमांक मालिका 'MH42BZ' सुरू करण्यात येणार आहे. या नव्या मालिकेमुळे नवीन दुचाकी खरेदी करणाऱ्या नागरिकांना आपल्या पसंतीचे तसेच आकर्षक वाहन क्रमांक मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी इच्छुक वाहनधारकांनी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून संबंधित कार्यालयाकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

वाहन खरेदी करताना अनेक नागरिक वाहनाच्या मॉडेल, रंग आणि वैशिष्ट्यांबरोबरच वाहनाच्या नोंदणी क्रमांकाबाबतही विशेष पसंती दर्शवितात. काही नागरिकांना आपल्या जन्मतारखेशी संबंधित क्रमांक हवा असतो, तर काहींना शुभ अंक, विशिष्ट अंकांची पुनरावृत्ती असलेले क्रमांक किंवा सहज लक्षात राहणारे आकर्षक क्रमांक मिळविण्याची इच्छा असते. त्यामुळे नवीन वाहन क्रमांक मालिका सुरू होण्याची माहिती वाहनधारकांसाठी महत्त्वाची ठरणार आहे.

बारामती उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या हद्दीत बारामती, दौंड आणि इंदापूर या तीन तालुक्यांचा समावेश होतो. या परिसरातील खाजगी दुचाकीधारकांसाठी 'MH42BZ' ही नवीन मालिका सुरू करण्यात येणार असल्याने या तिन्ही तालुक्यांतील नागरिकांना आपल्या पसंतीचा क्रमांक आरक्षित करण्याची संधी मिळणार आहे. विशेषतः आकर्षक क्रमांक मिळविण्यासाठी इच्छुक असलेल्या नागरिकांनी नवीन मालिका सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर संबंधित प्रक्रियेची माहिती घेणे आवश्यक आहे.

दरम्यान, नवीन मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक आरक्षित करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी अर्ज सादर करण्याबाबतचे स्वतंत्र वृत्तनिवेदन उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात येत आहे. या प्रक्रियेबाबतची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचावी आणि इच्छुक वाहनधारकांना वेळेत अर्ज करता यावा, या उद्देशाने तालुका माहिती कार्यालय, बारामती यांच्याकडे प्रसिद्धीसाठी विनंती करण्यात आली आहे.

या संदर्भात मा. सहायक माहिती अधिकारी, तालुका माहिती कार्यालय, बारामती यांना पत्र पाठविण्यात आले असून, बारामती, दौंड आणि इंदापूर या तिन्ही तालुक्यांतील सर्व दैनिक वृत्तपत्रांमध्ये सदर निवेदन विनामूल्य प्रसिद्ध करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील वाहनधारकांनाही नवीन वाहन क्रमांक मालिकेची माहिती सहज उपलब्ध होऊ शकणार आहे.

नवीन वाहन मालिका सुरू झाल्यानंतर पसंतीचे क्रमांक मिळविण्यासाठी नागरिकांकडून प्रतिसाद मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे आकर्षक किंवा विशेष क्रमांक आरक्षित करण्याची इच्छा असलेल्या दुचाकीधारकांनी संबंधित कार्यालयाकडून प्रसिद्ध होणाऱ्या अधिकृत सूचनांकडे लक्ष द्यावे. अर्ज सादर करण्याची पद्धत, आवश्यक कागदपत्रे, आरक्षण शुल्क, उपलब्ध क्रमांक आणि अर्ज स्वीकारण्याची मुदत याबाबतची माहिती अधिकृत वृत्तनिवेदनानुसार तपासूनच पुढील कार्यवाही करावी.

शरीराच्या हालचालींनी खेळता येणारा स्पेस गेम सादर

पुणे (दै. आरंभ पर्व)

नॅशनल कँडी डेच्या निमित्ताने देशातील आघाडीचा एफएमसीजी आणि बहुव्यावसायिक समूह धर्मपाल सत्यपाल ग्रुपने (डीएस ग्रुप- DS Group) पल्स कँडी डे मोहिमेच्या 2026 आवृत्तीची घोषणा केली. ब्रँडच्या वार्षिक राष्ट्रीय उत्सवाचा भाग असलेली यंदाची मोहीम पुन्हा एकदा तंत्रज्ञानावर आधारित नावीन्यपूर्ण उपक्रम घेऊन आली आहे. या आवृत्तीत अंतराळ संकल्पनेवर आधारित एक खिळवून ठेवणारा गेम सादर करण्यात आला आहे. खेळाडू हा गेम आपल्या हातांच्या आणि शरीराच्या हालचालींनी नियंत्रित करतात, ज्या स्मार्टफोनचा कॅमेरा टिपतो. हा अनुभव त्यांना थेट www.pulsecandyday.com या खास मायक्रोसाइटवर घेऊन जातो. जेन झी, तरुण आणि मोबाइलवर अधिक सक्रिय असलेल्या ग्राहकांसाठी तयार केलेला हा छोटेखानी गेम पुन्हा पुन्हा खेळण्यासाठी आणि सोशल मीडियावर शेअर करण्यासाठी प्रोत्साहित करतो. नॅशनल कँडी डेच्या आसपासच्या आठवड्यात, 3 ते 10 नोव्हेंबरदरम्यान हा गेम उपलब्ध असेल. यात वापरकर्त्यांना 60 सेकंदांच्या आंतरतारकीय साहसावर नेले जाते, जिथे त्यांना अंतराळात विखुरलेल्या पल्स कँडी गोळा करायच्या असतात आणि नकली कँडी, लघुग्रह व इतर खगोलीय अडथळे टाळायचे असतात. या मोहिमेत कॅमेऱ्यावर आधारित मोशन आणि जेश्चर ट्रॅकिंगचा वापर करण्यात आला आहे, जे वापरकर्त्याच्या हात आणि शरीराच्या हालचालींना रिअल टाइममध्ये प्रतिसाद देते. हा अनुभव थेट मोबाइल ब्राउझरवर चालतो आणि त्यासाठी कोणताही हेडसेट, कंट्रोलर किंवा अतिरिक्त हार्डवेअर लागत नाही. डीएस ग्रुपचे सीनियर जनरल मॅनेजर, मार्केटिंग, कन्फेक्शनरी अरविंद कुमार म्हणाले, "प्रत्येक नॅशनल कँडी डे आम्हाला आठवण करून देतो की लोकांचे पल्स कँडीवर किती प्रेम आहे. ही 'दीवानगी' आम्हाला त्यांच्यासोबत अशा प्रकारे साजरी करायची आहे, जी त्यांच्या कायम लक्षात राहील.



अखेर जुन्नर-भीमाशंकर रस्त्याची दुरुस्ती



जुन्नर (दै. आरंभ पर्व)

गेल्या काही दिवसापासून जुन्नर भीमाशंकर रस्त्यावर टाकलेला राडारोडा हटवून रस्त्याचे दुरुस्तीचे काम सुस्थितीत करण्यात आल्याने जुन्नरकरांनी दैनिक आरंभ पर्वचे विशेष आभार मानून अभिनंदन केले आहे. जुन्नर _भीमाशंकर असलेल्या मार्गाची प्रशासन अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित कारभारामुळे चाळन झाल्याने या मार्गावर वाहन चालकांना अनेक अडचणींना सामोरे जाण्याची वेळ येत होती. मात्र महिन्यापूर्वीच रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण काम करण्यात आल्याने नागरिकात समाधान व्यक्त करण्यात येत होते. मात्र काही दिवसापूर्वी रस्त्यालगत असलेली पिण्याची पाईप लाइन फुटल्याने या भागातील स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येत होती. त्यामुळे नागरिकांची मुख्य असलेला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागण्याच्या उद्देशाने या भागात रस्त्यालगत खोदाई करून पाईप लाइन जरी दुरुस्ती करण्यात आली असली तरी पण ठेकेदारामार्फत असलेला त्यामधील राडारोडा रस्त्यावर टाकल्यामुळे हा मार्ग वाहनचालकांना मृत्यूचा सापळा बनला होता. त्यातच रात्रीच्या सुमारास बंद असलेल्या पथदिव्यामुळे सदर राडारोड्याचा अंदाज दुचाकीस्वारांना येत नसल्याने या ठिकाणी अनेक छोटे मोठे अपघाताच्या घटना घडून अनेक दुचाकीस्वार संबंधित राडारोड्यावरून घसरून जखमी झाले होते. त्यामुळे ठेकेदारास व ग्रामपंचायत प्रशासनास यासंदर्भात माहिती देऊन ही ठेकेदार फोन उचलण्यास टाळाटाळ करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नागरिकांना उडवाउडवीची उत्तरे ऐकण्याची वेळ येत होती याबाबत दैनिक आरंभ पर्व प्रतिनिधींना माहिती मिळताच दोन दिवसापूर्वी जुन्नर भीमाशंकर रस्त्यावरील ट्रॅक बनला धोकादायक हे वृत्त प्रसिद्ध होताच बातमीची दखल घेत सदरच्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम प्रगती पथावर करण्यात आल्याने या भागातील स्थानिक नागरिकांनी दैनिक आरंभ पर्व चे विशेष आभार व्यक्त करून आभार मानले व आपला आनंद देखील साजरा केला.

दै. आरंभपर्व दणका

आंदोलकांची प्रकृती खालावली

टोरेंट प्रकल्प रद्द करण्याची मागणी



आंबेगाव (दै. आरंभ पर्व)

शिवभूमी सह्याद्री बचाव समन्वय समिती'च्या वतीने भीमाशंकर येथे बेमुदत अमरण उपोषण करणाऱ्या आंदोलकांचे प्रकृती खालावल्याने त्यांना वैद्यकीय उपचार घेण्याची विनंती तळेघर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केली आहे.

सह्याद्रीतील २३ विनाशकारी प्रकल्पांसह भीमाशंकर कर्जत येथील प्रस्तावित टोरेंट प्रकल्प रद्द करण्याची प्रमुख मागणी आंदोलकांनी केली आहे. या उपोषणात अनिल तिटकारे, नारायण हिले, शरद ठोकळ, सौरभ बोंडे आणि विजय केंगले सहभागी झाले आंदोलकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सह्याद्रीतील २३ प्रकल्प आणि भीमाशंकरमधील टोरेंट प्रकल्प रद्द करणे, बेकायदेशीर जंगलतोड करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे, पश्चिम घाटातील इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) आणि इकोलॉजिकली सेन्सिटिव्ह एरिया (ESA) संदर्भातील कार्यवाही रद्द करणे, तसेच स्थानिक आदिवासींच्या संमतीशिवाय कोणतेही निर्णय घेऊ नयेत, पेसा (PESA) कायद्याची कठोर अंमलबजावणी करून ग्रामसभेचे अधिकार डावलणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, आदिवासी भागातील धरणांमधील पाणी स्थानिकांना मिळावे, वनक्षेत्रातील गौण खनिजांची बेकायदेशीर वाहतूक व तस्करी थांबवावी. आदिवासींच्या वनउपजाला कायदेशीर किमान आधारभूत किंमत लागू करून त्यासाठी बाजार समित्या स्थापन करा याही मागण्या केल्या आहेत 'जल, जंगल, जमीन आमच्या हक्काची' अशा घोषणा आंदोलनाच्या ठिकाणी भेटी देणारे देत आहेत तर राज्यातील असंख्य भाविक या आंदोलनाला पाठिंबा देत होते.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. ०४ नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे

kotak neo

दिवाळीच्या मुहूर्त ट्रेडिंगसाठी कोटक निओतर्फे समभागांची निवड

मुंबई (आरंभ पर्व) : कोटक सिक्युरिटीज लिमिटेडची रिटेल ब्रोकिंग शाखा असलेल्या 'कोटक निओ'ने यंदाच्या दिवाळीनिमित्त संवत २०८३ मधील मुहूर्त ट्रेडिंगसाठी मूलभूत आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे निवडलेल्या सर्वोत्तम समभागांची यादी जाहीर केली आहे. दिवाळीनिमित्त शुभेच्छा देताना, कोटक निओचे इक्विटी रिसर्च प्रमुख श्रीकांत चौहान म्हणाले, 'दीर्घकाळ चाललेली मंदी आणि बाजारातील अस्थिरतेनंतर, संवत २०८३ हे दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी अधिक अनुकूल आणि सकारात्मक वातावरण घेऊन आले आहे. निफ्टी ५० (Nifty 50) चा दर आर्थिक वर्ष २०२७ च्या अंदाजित कमाईच्या सुमारे १८.५ पट आणि आर्थिक वर्ष २०२८ च्या अंदाजित कमाईच्या १६.० पटीवर स्थिरावलेला आहे. आर्थिक वर्ष २०२७ मध्ये कमाईची वाढ सुमारे १८% आणि आर्थिक वर्ष २०२८ मध्ये १३% राहील, असा आमचा अंदाज आहे. भौगोलिक-राजकीय घडामोडी, कच्च्या तेलाच्या किमती आणि जागतिक आर्थिक परिस्थिती यामुळे नजीकच्या काळात बाजारातील अस्थिरता कायम राहू शकते, तरीही भारताची संरचनात्मक वाढ अतिशय मजबूत दिसत असल्याची आमची ठाम धारणा आहे. गुंतवणूकदारांनी बाजाराचा अचूक तळ शोधण्याचा प्रयत्न करणे टाळावे आणि त्याऐवजी बाजारात मोठी घसरण झाल्यास, दर्जेदार लार्ज-कॅप आणि निवडक मिड-कॅप समभागांना प्राधान्य देत मजबूत स्थिती असलेल्या कंपन्यांचे समभाग हळूहळू जमा करावेत, अशी आमची गुंतवणूकदारांना सूचना आहे. या दिवाळीनिमित्त, मी सर्व गुंतवणूकदारांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना समृद्धी, उत्तम आरोग्य आणि आनंदासाठी शुभेच्छा देतो. संवत २०८३ हे वर्ष सर्वांसाठी शिस्तबद्ध गुंतवणूक, फायदेशीर संधी आणि संपत्तीची दीर्घकालीन निर्मिती घेऊन येवो.'

बॉम्बे डाइंगच्या नावाने बनावट 'कोरल व्हाइन' उत्पादनांची विक्री

- ग्राहकांना सतर्कतेचा इशारा

पुणे (आरंभ पर्व) : देशातील विश्वासार्ह होम टेक्स्टाइल ब्रँडपैकी एक असलेल्या आणि १४७ वर्षांहून अधिक परंपरा लाभलेल्या बॉम्बे डाइंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेडने (बॉम्बे डाइंग) 'कोरल व्हाइन' या नावाने विकल्या जाणाऱ्या बनावट उत्पादनांबाबत ग्राहकांना सावध करणारी सार्वजनिक सूचना जारी केली आहे. काही अनधिकृत विक्रेते रस्त्यांवर, दुकानांमध्ये आणि निवासी सोसायट्यांमध्ये ही उत्पादने विकत असल्याचे कंपनीच्या निदर्शनास आले आहे. हे विक्रेते बनावट लेबले वापरून बॉम्बे डाइंगशी संबंधित असल्याचा खोटा दावा करत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. कंपनीने जारी केलेल्या सूचनेनुसार, 'कोरल व्हाइन' या नावाची उत्पादने बॉम्बे डाइंगकडून आता उत्पादित किंवा विकली जात नाहीत. त्यामुळे सध्या अनधिकृत विक्रेत्यांकडून या नावाने विकली जाणारी उत्पादने बॉम्बे डाइंगची अस्सल उत्पादने नाहीत. कंपनीने स्पष्ट केले आहे की, या विक्रेत्यांना कंपनीचे नाव किंवा लोगो वापरण्याचा तसेच ब्रँडशी कोणताही संबंध असल्याचा दावा करण्याचा अधिकार नाही. या बनावट उत्पादनांच्या गुणवत्तेबाबतही बॉम्बे डाइंगने चिंता व्यक्त केली आहे. ही उत्पादने कंपनीच्या अस्सल उत्पादनांच्या तुलनेत निकृष्ट दर्जाची असून, ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण करू शकतात. विशेषतः त्वचेची गंभीर ॲलर्जी होण्याची शक्यता कंपनीने व्यक्त केली आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्टॉलवर, रस्त्याच्या कडेला किंवा अनधिकृत विक्रेत्यांकडून आकर्षक सवलतींचे आमिष दाखवून विकली जाणारी उत्पादने खरेदी करताना ग्राहकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन कंपनीने केले आहे.

सोनालिकाने १,२१,१४८ ट्रॅक्टर्सची सर्वोच्च एकूण विक्री नोंदवली



पुणे (आरंभ पर्व) : भारतातील अव्वल ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टर्सने एप्रिल ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत १,२१,१४८ ट्रॅक्टर्सची आतापर्यंतची सर्वोच्च वायटीएम (वर्षातील आतापर्यंतच्या महिन्यापर्यंत) एकूण विक्री नोंदवत प्रभावी मापदंड प्रस्थापित केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीचा पाया देशांतर्गत बाजारपेठेत कंपनीने घेतलेल्या अभूतपूर्व गतीवर आधारित आहे, ज्याअंतर्गत सोनालिकाने सर्वात जलद वेळेत १ लाख ट्रॅक्टर्सच्या विक्रीचा टप्पा गाठला. आपल्या ३० व्या वर्धापनदिनाच्या भव्य वर्षात ही कामगिरी कंपनीची वाढीची प्रचंड इच्छाशक्ती आणि कृषी क्षेत्राच्या भविष्यासाठीची विस्तारणारी दूरदृष्टी दर्शवते, जी धाडसी महत्त्वाकांक्षांचे सातत्याने उत्कृष्ट व्यावसायिक परिणामांमध्ये रूपांतर करते. या वाटचालीच्या केंद्रस्थानी सोनालिकाची धोरणात्मक दूरदृष्टी, जागतिक दर्जाची उत्पादन गुणवत्ता, बाजारपेठेतील प्रतिसादात्मकता आणि सर्व स्तरांवरील उत्कृष्टतेप्रती कटिबद्धता यांचा संगम आहे. कंपनीचा पुरोगामी दृष्टिकोन प्रगत कृषी तंत्रज्ञान, विशिष्ट गरजांनुसार अभियांत्रिकी आणि पारदर्शक व्यावसायिक पद्धती एकत्र आणतो, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य कृषी उपाय मिळतील, याची खात्री होते.

७५ लाखांच्या सुशोभीकरण कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

- चौकशीसाठी बसपाचे शिवाजी शिंदे यांचे उपोषण
- ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यासह क्वालिटी कंट्रोलमार्फत तपासणी करण्याची मागणी
- मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

इंदापूर (दै. आरंभ पर्व)

इंदापूर शहरातील भार्गवराम उद्यानाच्या सुशोभीकरणासाठी सुरू असलेल्या सुमारे ७५ लाख रुपये खर्चाच्या कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करत बहुजन समाज पार्टीचे इंदापूर शहराध्यक्ष शिवाजी शिंदे यांनी इंदापूर नगरपरिषद कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण सुरू केले. सदर कामातील झालेल्या कामांची गुणवत्ता निकृष्ट असल्याचा आरोप करत संपूर्ण कामाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. भार्गवराम उद्यानाच्या सुशोभीकरणासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात येत असून या कामांतर्गत सिंगापूर ट्री, लहान मुलांसाठी खेळणी, ज्येष्ठ नागरिकांसाठी चालण्याचा मार्ग, पेव्हर ब्लॉक, स्ट्रीट लाईट, कारंजे तसेच नागरिकांच्या विश्रांतीसाठी गॅझिबो यांसह



विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. मात्र, या कामांपैकी काही कामे पूर्ण झाली असून काही कामे अद्याप अपूर्ण आहेत. पूर्ण झालेल्या कामांच्या दर्जाबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात असून अनेक कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचा आरोप बसपाच्या वतीने करण्यात आला आहे. नगरपालिकेच्या विकासकामांवर खर्च होणारा निधी हा सर्वसामान्य नागरिकांच्या करस्वरूपाने जमा झालेल्या पैशातून उपलब्ध होतो. त्यामुळे विकासकामे केवळ कागदोपत्री पूर्ण दाखवून चालणार नाहीत, तर ती दर्जेदार, टिकाऊ आणि नागरिकांच्या उपयोगाची असणे आवश्यक आहे. एका बाजूला शहरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू असल्याचे सांगितले जाते, तर दुसऱ्या बाजूला कामांच्या गुणवत्तेबाबत आणि अपूर्ण कामांबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. बाजारपेठेतील रस्त्याच्या कामाबाबतही एका रात्रीत काम उरकण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित होत असून अशा कामांची गुणवत्ता तपासण्याची गरज असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. भार्गवराम उद्यानाच्या सुशोभीकरण कामाची तातडीने स्वतंत्र तांत्रिक चौकशी करण्यात यावी, क्वालिटी कंट्रोल विभागामार्फत कामाचे नमुने तपासण्यात यावेत, कामासाठी नियुक्त ठेकेदाराची चौकशी करून दोष सिद्ध झाल्यास त्याला काळ्या यादीत टाकण्यात यावे, तसेच कामावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा मागण्या बसपाच्या वतीने करण्यात आल्या आहेत. तसेच उद्यानातील मंजूर आराखड्यानुसार सर्व कामे तातडीने पूर्ण करावीत आणि नागरिकांना अपेक्षित असलेल्या सर्व सुविधा प्रत्यक्ष उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात बहुजन समाज पार्टीच्या वतीने इंदापूर नगरपरिषद कार्यालयाकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. विकासकामांना आमचा विरोध नाही; मात्र जनतेच्या पैशातून होणारी कामे दर्जेदार झालीच पाहिजेत. उद्यानाचे सुशोभीकरण केवळ कागदावर किंवा उद्घाटनापुरते न राहता नागरिकांना प्रत्यक्ष त्याचा लाभ मिळाला पाहिजे. दोषी ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, हीच आमची भूमिका आहे, असे बहुजन समाज पार्टीचे इंदापूर शहराध्यक्ष शिवाजी शिंदे यांनी सांगितले.

मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करणार

या मागण्यांबाबत शासन आणि प्रशासनाने गांभीर्याने विचार न केल्यास पुढील काळात संबंधित ठेकेदार व जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवाजी शिंदे यांनी दिला आहे. यामध्ये नगरपरिषदेसमोर नग्न आंदोलन व घंटानाद आंदोलन करण्यात येईल. त्यानंतरही न्याय न मिळाल्यास पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

लिम्काकडून पंजाब स्पेशल कॅन लाँच

पंजाब (दै. आरंभ पर्व)

लिम्का या कोका-कोला इंडियाच्या लोकप्रिय पेयाने आपला पहिला लिम्का पंजाब स्पेशल कॅन लाँच केला आहे. हे लिमिटेड-एडिशन कलेक्टिबल आहे, जे पंजाबचा अनोख उत्साह जिवंत करते. "वन स्टेट, वन कॅन: क्राफ्टेड फॉर कलेक्शन" संकल्पनेअंतर्गत डिझाइन केलेले हे विशेष एडिशन दैनंदिन लिम्का कॅनचे रूपांतर स्थानिक अभिमानाच्या कॅनव्हासमध्ये करते, ज्यामध्ये पंजाबची समृद्ध संस्कृती आणि वारसा एकत्र आणला गेला आहे. हे डिझाइन पंजाबला वैशिष्ट्यपूर्ण बनवणाऱ्या अनेक पैलूंचा सन्मान करते, तसेच तेथील चैतन्यमय परंपरा, सांस्कृतिक ओळख आणि विशिष्ट भावनेला सादर करते. केवळ रिफ्रेशिंग पेय असण्यापलीकडे पंजाब स्पेशल कॅन आकर्षक आठवण असून ग्राहकांसाठी संकलनाचा नवीन अनुभव घेऊन येतो. लिमिटेड-एडिशन म्हणून तयार केलेला हा कॅन शोध, देवाणघेवाण आणि संकलनाला प्रेरणा देण्याच्या उद्देशाने डिझाइन करण्यात आला आहे, ज्यामुळे तरुण आणि शहरी ग्राहकांना आपल्या राज्याचा अभिमान साजरा करण्याचा नवीन



मार्ग मिळतो. हे लाँच बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडेचा सहभाग असलेल्या इन्स्टाग्रामवरील ग्राहक-केंद्रित सोशल मोहिमेद्वारे या स्पेशल कॅनच्या संकल्पनेला प्रत्यक्षात आणते. ही मोहीम कलाकार आणि क्रिएटर्सना या संवादात सहभागी करून घेईल, ज्यामुळे त्यांना पंजाबची संस्कृती, ऐतिहासिक ठिकाणे आणि दैनंदिन अनुभवांबद्दल स्वतःचे दृष्टिकोन मांडण्यास प्रोत्साहन मिळेल.

एकत्रितपणे हे सर्व प्रख्यात व्यक्ती ग्राहकांना केवळ उत्पादनाच्या पलीकडे जाऊन या स्पेशल कॅनशी जोडले जाण्यासाठी आणि राज्याला खास बनवणाऱ्या अनेक घटकांचा उत्सव साजरा करण्यासाठी आवाहन करतात. कोका-कोला इंडियाच्या उत्तर भारतातील इंटिग्रेटेड ऑपरेशन्सचे सीनियर डायरेक्टर पंकज सिन्हा म्हणाले, "लोकप्रिय देशांतर्गत ब्रँड म्हणून लिम्का पंजाबचे वैशिष्ट्य अद्वितीय स्वरूपात सादर करते.

आरोग्याची नवी ज्योत, कारागृहात उपचाराची जोड!

येरवडा खुल्या कारागृहात ७७ बंदिवान व कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी

- भारती विद्यापीठ आयुर्वेद रुग्णालय आणि विंग्स ऑफ ड्रीम्स फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

पुणे (दै. आरंभ पर्व)

कारागृहातील बंदिवानांनाही दर्जेदार आरोग्यसेवा आणि वैद्यकीय उपचार मिळावेत, या सामाजिक बांधिलकीतून भारती विद्यापीठ आयुर्वेद रुग्णालय व कॉलेज (सातारा रोड) आणि विंग्स ऑफ ड्रीम्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा खुले कारागृह येथे मोफत विशेष आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात बंदिवानांसह कारागृहातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करून आवश्यक आयुर्वेदिक औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. या आरोग्य शिबिरात रक्तदाब, रक्तातील साखर, रक्त तपासणी, हिमोग्लोबिन, संपूर्ण शारीरिक तपासणी तसेच नेत्रतपासणी करण्यात आली. याशिवाय तज्ज्ञ डॉक्टरांकडून



वैद्यकीय सल्ला, आवश्यक उपचार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले. या उपक्रमाचा एकूण ७७ बंदिवान आणि कारागृह कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला. तपासणीनंतर संबंधितांना आवश्यक समुपदेशन, उपचार आणि पुढील वैद्यकीय तपासण्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिरासाठी भारती विद्यापीठ आयुर्वेद रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने विशेष योगदान दिले. यामध्ये डॉ. आराध्य मुदाणे (पंचकर्म), डॉ. रोशनी शेख (नेत्ररोग), डॉ. सुजीत शेळके (कायाचिकित्सा), तसेच इंटर्न मुस्कान पाटील, आचल सोमसेटवार, योगिता चौधरी, अक्षय पाटील आणि अतुल धारे यांचा समावेश होता.

विंग्स ऑफ ड्रीम्स फाउंडेशनच्या वतीने अजय महानवर आणि बलवीर सूर्यवंशी (कॅम्प पायोनियर हेड), अजिंक्य झांजे (एडिटर), वीरेंद्र प्रजापती, प्रणव शिंदे, आकाश कांबळे आणि समीक्षा हिरे (स्वयंसेवक) यांनी शिबिराच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कारागृह अधीक्षक शामकांत शेडगे, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, निशा श्रेयकर, कार्यालयीन अधीक्षक नीता उके, वरिष्ठ लिपिक गोविंद गावडे, लिपिक प्रवीण खुस्पे, मिश्रक अभिषेक रौंधळ, सुभेदार बालाजी सावंत, सुनील गायकवाड, हवालदार राजेंद्र धनगर, प्रकाश भोसले, दत्ता मोडक, शिपाई अशोक होले, राकेश पवार, महेंद्र लोहकरे, महेश हळदकर, वैभव पाटील, सरला साबळे, सुरेखा म्हेत्रे, संध्या जाधवर, मिझबा सय्यद, मोनिका लांडगे आणि इतर कर्मचाऱ्यांनी सुरक्षा व्यवस्था, समन्वय व नियोजनाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली. कारागृहातील बंदिवानांच्या आरोग्याची काळजी घेणे हीदेखील सामाजिक जबाबदारी आहे.

दिवाळीचा आनंद विद्यार्थ्यांसोबत साजरा

डाबर आल्मंड हेअर ऑइलचा लोहगाव येथील महानगरपालिका शाळेत उपक्रम

पुणे (दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्रातील दिवाळीच्या अभ्यंगस्नानाच्या समृद्ध परंपरेचा गौरव करत डाबर आल्मंड हेअर ऑइलने एक विशेष सणासुदीचा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामध्ये समाजाभिमुख कार्यक्रम, उत्पादनाची बाजारपेठेतील उपलब्धता वाढविण्याचे प्रयत्न आणि कौटुंबिक नातेसंबंध व नव्या सुरुवातींचा संदेश देणाऱ्या हृदयस्पर्शी डिजिटल चित्रपटाचा समावेश आहे. या माध्यमातून ग्राहकांशी असलेले नाते अधिक दृढ करण्यासोबतच केसांची योग्य निगा राखण्याच्या सवयींना प्रोत्साहन देणे आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे जतन करणे, हे ब्रँडचे उद्दिष्ट आहे. नरक चतुर्दशीच्या दिवशी साजरी केली जाणारी दिवाळीची अभ्यंगस्नान परंपरा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. या परंपरेनुसार, धार्मिक विधीपूर्वक स्नान करण्यापूर्वी कुटुंबातील सदस्य केसांना आणि शरीराला पोषक तेल लावतात. ही परंपरा आरोग्य, नवचैतन्य आणि सणाच्या स्वागताची तयारी यांचे प्रतीक मानली जाते. या परंपरेला असलेले सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेता, दरवर्षी दिवाळीच्या आधी महाराष्ट्रात केसांच्या तेलाच्या मागणीत मोठी वाढ होते.

या पार्श्वभूमीवर डाबरकडून पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत लोहगाव येथे असलेल्या विद्यालय क्रमांक १ मध्ये विद्यार्थ्यांसाठी समाजाभिमुख उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत संवादात्मक सत्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, स्वतःची निगा राखणे आणि केसांची योग्य काळजी घेण्याच्या सवयींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ३०० शालेय विद्यार्थ्यांना डाबर आल्मंड हेअर ऑइलचे वाटप करण्यात येत आहे. लहान वयापासूनच स्वतःच्या आरोग्याची आणि स्वच्छतेची काळजी घेण्याच्या सवयी विकसित व्हाव्यात तसेच विद्यार्थ्यांचे सर्वांगीण कल्याण साधले जावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

याप्रसंगी डाबर इंडिया लिमिटेडचे दिनेश कुमार, शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापक प्रशांत वाघमारे, शिक्षक मुक्ता पवार, नितीन वाणी, मारुती पोटे, जयश्री गेंगजे, दत्तात्रय आढाव, मनीषा नाईकवाडी, भीमराव रणधीर, वैभव गुलिंग, प्रशांत वाघमारे, आशा मोरे, वैशाली खांदवे, नीता काकडे, मेघा राणी माळगे, उपस्थित होते.. दिवाळीच्या काळात वाढणारी मागणी पूर्ण करण्यासाठी, विशेषतः वितरण व्यवस्था मर्यादित असलेल्या भागांमध्ये उत्पादनाची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी, डाबरने महाराष्ट्रातील विविध भागांत विशेष वितरण वाहने तैनात केली आहेत. ही वाहने स्थानिक उप-वितरकांकडून उत्पादनांचा साठा उपलब्ध करून घेतात आणि नियमित वितरण व्यवस्था मर्यादित असलेल्या बाजारपेठेपर्यंत डाबर आल्मंड हेअर ऑइल पोहोचवतात. याशिवाय, सणासुदीच्या काळात ग्राहकांशी अधिक प्रभावी संवाद साधण्यासाठी विक्री केंद्रांवरील आकर्षक ब्रँडिंग, किरकोळ विक्री केंद्रांमधील उत्पादनांची ठळक दृश्यता आणि प्रत्यक्ष बाजारपेठेत राबविण्यात येणारे विविध उपक्रम यांवरही भर दिला जात आहे.

या मोहिमेला भावनिक स्पर्श देण्यासाठी डाबर आल्मंड हेअर ऑइलने एक मराठी डिजिटल चित्रपटही सादर केला आहे. अभ्यंगस्नानाच्या परंपरेच्या पार्श्वभूमीवर साकारलेल्या या चित्रपटात कौटुंबिक पाठिंबा, प्रेम आणि आयुष्यातील नव्या संधींचा हृदयस्पर्शी संदेश देण्यात आला आहे. महाराष्ट्रीय कुटुंबाच्या पार्श्वभूमीवर आधारित या चित्रपटात पुनर्विवाहाद्वारे आयुष्याची नवी सुरुवात करणाऱ्या सुनेला प्रेमाने साथ देणाऱ्या सासूची कथा मांडण्यात आली आहे. अभ्यंगस्नानापूर्वी केसांना तेल लावण्याच्या परिचित परंपरेतून हा चित्रपट प्रेम, स्वीकार आणि भावनिक आधार यांचे सुंदर दर्शन घडवतो. त्याचबरोबर, आपल्या प्रिय सणाच्या परंपरेकडे पाहण्याचा एक नवा आणि सकारात्मक दृष्टिकोनही मांडतो. या उपक्रमाबाबत बोलताना डाबर इंडिया लिमिटेडच्या हेअर केअर विभागाचे विपणन प्रमुख श्री. अंकुर कुमार म्हणाले, "दिवाळीचे अभ्यंगस्नान हा महाराष्ट्राच्या



सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहे. या अर्थपूर्ण विधी आणि परंपरांच्या माध्यमातून आजही कुटुंबातील सदस्य एकत्र येतात. आमच्या एकात्मिक उपक्रमाद्वारे दिवाळीच्या काळात महाराष्ट्रातील ग्राहकांना डाबर आल्मंड हेअर ऑइल सहज उपलब्ध व्हावे, तसेच शालेय उपक्रमांच्या माध्यमातून मुलांमध्ये केसांची योग्य निगा राखण्याच्या आरोग्यदायी सवयी विकसित व्हाव्यात, हा आमचा प्रयत्न आहे. आमचा नवीन अभ्यंगस्नानावरील चित्रपट प्रेम, स्वीकार आणि नव्या सुरुवातींच्या मूल्यांचा गौरव करतो. या मूल्यांमुळे पिढ्यान्पिढ्या कौटुंबिक नाती अधिक दृढ होत असतात आणि सणांचा खरा आनंद अधोरेखित होतो."

थोडक्यात पण महत्वाचे



दारोदारी साकारले राजगड, रायगड अन् प्रतापगड

मसूर (आरंभ पर्व) : छत्रपती शिवाजी महाराजांचे अतुलनीय शौर्य, पराक्रम, धाडस आणि स्वराज्यनिर्मितीचा गौरवशाली इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हणबरवाडी (ता. कराड) येथे यंदाही दिवाळीनिमित्त भव्य किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे यंदा पाचवे वर्ष असून गावातील लहानग्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि मेहनतीतून दारोदारी राजगड, रायगड, प्रतापगड यांसह विविध ऐतिहासिक गडकोटांच्या प्रतिकृती साकारल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण गावात शिवशौर्याचा जागर पाहायला मिळत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची ओळख केवळ पुस्तकांपुरती मर्यादित न राहता तो मुलांच्या मनामनांत रुजावा, त्यांच्यामध्ये स्वाभिमान, धाडस, नेतृत्वगुण, चिकाटी आणि देशप्रेमाची भावना निर्माण व्हावी, या हेतूने ही स्पर्धा सुरू करण्यात आली आहे. दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये मुलांनी मोबाईल आणि टीव्हीपासून दूर राहून प्रत्यक्ष कृतीतून इतिहास जाणून घ्यावा, तसेच किल्ल्यांची रचना, त्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि महाराजांच्या गनिमी काव्याची माहिती समजून घ्यावी, यासाठी आयोजकांनी हा अभिनव उपक्रम सुरू ठेवला आहे. चित्रपट लेखक-दिग्दर्शक रामकुमार शेडगे, सातारा पोलीस दलातील सिद्धनाथ शेडगे, लता शेडगे आणि गोरखनाथ शेडगे यांच्या पुढाकारातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

'आर्ट फॉर होप' उपक्रमांतर्गत ६० लाख रुपये मूल्याच्या अनुदानांची घोषणा



गुरुग्राम (आरंभ पर्व) : ह्युंडाई मोटर इंडिया फाऊंडेशन (एचएमआयएफ) या ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेड (एचएमआयएल) च्या सीएसआर शाखेने आज संपूर्ण भारतातील सर्जनशील प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी ६० लाख रुपये मूल्याची अनुदाने उपलब्ध करून देत आपल्या प्रमुख आर्ट फॉर होप उपक्रमाचा सीझन ६ सुरू करण्याची घोषणा केली. 'इंडिया इन मोशन' संकल्पनेवर आधारित सीझन ६ कलाकार, कारागीर, कला समूह आणि सर्जनशील व्यावसायिकांना अर्ज करण्याचे आवाहन करते, ज्यामुळे वेगाने प्रगती करणारा भारत कलेच्या माध्यमातून नवीन विचार, ओळख आणि शक्यता कशा प्रकारे निर्माण करत आहे याचा शोध घेता येईल. निवडक लाभार्थ्यांना आर्थिक साहाय्य, मार्गदर्शन, राष्ट्रीय ओळख आणि आर्ट फॉर होप फेस्टिव्हलमध्ये आपले काम प्रदर्शित करण्याची संधी दिली जाईल. आर्ट फॉर होप - सीझन ६ च्या शुभारंभाबाबत मत व्यक्त करत एचएमआयएलचे एमडी आणि सीईओ श्री. तरुण गर्ग म्हणाले, "ह्युंडाईमध्ये आमचा जागतिक दृष्टीकोन 'प्रोग्रेस फॉर ह्युमॅनिटी' केवळ मोबिलिटीपुरता मर्यादित नसून व्यक्ती आणि समाजाला सक्षम करणाऱ्या संधी निर्माण करण्यावर भर देतो. 'आर्ट फॉर होप'च्या माध्यमातून आम्ही २.२० कोटी रुपये मूल्यापेक्षा जास्त रकमेची अनुदाने दिली आहेत, भारतभरातील २०० हून अधिक कलाकारांना पाठबळ दिले आहे आणि ७५ हून अधिक पारंपारिक व लोककला प्रकारांचे जतन करण्यास मदत केली आहे. सीझन ६ मध्ये एकूण ६० लाख रुपये मूल्याची अनुदाने देऊन आम्ही वेगाने बदलणाऱ्या भारताच्या महत्त्वाकांक्षा, विविधता आणि गतीचे प्रतिबिंब मांडणाऱ्या सर्जनशील आवाजांना बळ देण्यास उत्सुक आहोत. विश्वास, अभिमान आणि प्रगती या मूल्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही कलेच्या माध्यमातून सांस्कृतिक समावेशन, सर्जनशीलता आणि सामाजिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी कटिबद्ध आहोत."

कॉमिक कॉन इंडिया पुणे एडिशनचे ६ आणि ७ फेब्रुवारी २०२७ रोजी आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : मारुती सुझुकी प्रस्तुत आणि क्रंचिरोलच्या सहयोगाने 'पुणे कॉमिक कॉन' येत्या ६ आणि ७ फेब्रुवारी २०२७ रोजी पुण्यातील मेस्से ग्लोबल लक्ष्मी लॉन्स येथे आयोजन करण्यात आले आहे. पॉप कल्चरच्या विविध पैलूंचा अनुभव देणारा हा दोन दिवसांचा महोत्सव मनोरंजनाची अनोखी पर्वणी ठरणार आहे. गेल्या काही वर्षांत पुणे हे मनोरंजन क्षेत्रातील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास आले आहे. विद्यार्थी, तरुण आयटी व्यावसायिक आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा यांचा अनोखा संगम पुण्यात पाहायला मिळतो. कला, संगीत आणि साहित्याविषयीची शहराची खोलवर रुजलेली आवड तसेच आधुनिक मनोरंजनाच्या नव्या प्रकारांबद्दल वाढत असलेला उत्साह यामुळे कॉमिक कॉन आणि पॉप कल्चरच्या वाढत्या चाहता वर्गासाठी पुणे हे महत्त्वाचे ठिकाण बनत आहे. कॉमिक कॉन इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शेफाली जॉन्सन म्हणाल्या, "शनिवार पेठेतील ऐतिहासिक रस्ते, डेक्कन सारखे सांस्कृतिक केंद्र, गजबजलेला एफ. सी. रोड तसेच औंध आणि विमाननगर मधील सर्जनशील वातावरण अशा विविध वैशिष्ट्यांमुळे पुण्याचे स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्त्व आहे. मराठी रंगभूमी, साहित्य, चित्रपट आणि कलेविषयीचे शहराचे प्रेम त्याच्या सांस्कृतिक ओळखीची साक्ष देते. ही ओळख परंपरेशी घट्ट जोडलेली असतानाच सातत्याने विकसितही होत आहे. स्थानिक संस्कृती आणि जागतिक प्रभावांचा हा अनोखा संगम पुण्याला कॉमिक कॉनसाठी एक उत्तम ठिकाण बनवतो. सर्जनशीलता, स्वतःची अभिव्यक्ती आणि पॉप कल्चरविषयीच्या आवडीचा उत्सव साजरा करण्यासाठी शहरातील चाहत्यांना एकत्र आणणाऱ्या या वीकेंडची आम्ही आतुरतेने वाट पाहत आहोत." नॉडविन गेमिंगचे सहसंस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक अक्षत राठी म्हणाले, "शनिवारवाड्याचा ऐतिहासिक वारसा ते कोरेगाव पार्कमधील गजबजलेली कॅफे संस्कृती, अशा अनेक वैशिष्ट्यांनी पुणे शहर समृद्ध आहे.

अनाकलनीय : मुख्यालयाबाहेर पोलिसांचे आंदोलन

- **अधिकाऱ्यांच्या बदल्या रद्द करण्याची मागणी**
- **आंदोलनाचे नेतृत्व करणारे एसीपी मनस्वी वशिष्ठ निलंबित**
- **दिल्ली पोलिसांच्या इतिहासातील अभूतपूर्व घटनेने खळबळ**

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

दिल्लीत कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची, तसेच शिस्तीचे पालन करून घेण्याची जबाबदारी सांभाळणारे पोलिस स्वतःच संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. सोमवारी दिल्ली पोलिस मुख्यालयाबाहेर खाकी वर्दीत पोहोचलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांनी आपल्या दोन अधिकाऱ्यांच्या बदलीविरोधात आंदोलन केले. आंदोलनात सुरुवातीला सुमारे १०० ते १५० पोलिस कर्मचारी सहभागी झाले होते. नंतर ही संख्या ५०० पर्यंत पोहोचली. पोलिस खात्यातील या अभूतपूर्व घटनेने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या आंदोलनाचे नेतृत्व एसीपी मनस्वी वशिष्ठ करत होते. त्यांना निलंबित करण्यात आले आहे.



या वादाची सुरुवात २३ ऑक्टोबर रोजी शहादरा पोलिस ठाण्यात पोलिस आणि वकिलांमध्ये झालेल्या चकमकीतून झाली होती. वकील ललित बन्सल यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे समोर आले होते. त्यानंतर वकिलांनी पोलिसांवर गैरवर्तन केल्याचा आणि प्रकरणात योग्य कारवाई न केल्याचा आरोप केला. एसीपी मनस्वी वशिष्ठ यांनी असभ्य वर्तणूक केली आणि आपली सर्व्हिस रिव्हॉल्व्हर दाखवली, असा आरोप वकिलांनी केला होता. मात्र, एसीपींनी हे आरोप फेटाळून लावले होते. दुसरीकडे, पोलिसांच्या वतीनेही वकिलांवर सरकारी कामात अडथळा आणल्याचा आणि कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला. वाद वाढल्याने दिल्लीतील जिल्हा न्यायालयांच्या वकिलांनी अनिश्चित काळासाठी संप सुरू केला होता.

प्रकरण शांत करण्यासाठी २८ ऑक्टोबर रोजी पोलिस मुख्यालयाने एसीपी मनस्वी वशिष्ठ यांची, तसेच शहादरा पोलिस ठाण्याचे एसएचओ निरीक्षक अरुण कुमार यांचीही सुरक्षा विभागात रवानगी करण्यात आली. यानंतर वकिलांनी संप मागे घेतला. मात्र, या बदल्यांमुळे पोलिस दलातील एका वर्गात नाराजी पसरली. दुसरी बाजू न ऐकताच अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आल्याचे पोलिस कर्मचाऱ्यांचे म्हणणे होते. याच निषेधार्थ सोमवारी पोलिस कर्मचारी मुख्यालयाबाहेर जमले आणि दोन्ही अधिकाऱ्यांना परत आधीच्या जागी बदली करण्याची मागणी केली. एसीपी वशिष्ठ यांच्या तक्रारीवरून नोंदवलेली एफआयआर रद्द करू नये आणि प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणीही आंदोलकांनी केली. दिल्ली पोलिस आयुक्त अनुग्रह कुमार यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलिस कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. पोलिसांच्या समस्यांचे वेळेत निवारण केले जाईल, असे आश्वासन त्यांना देण्यात आले. दुसरीकडे मंगळवारी, मनस्वी वशिष्ठ यांना निलंबित करण्यात आले.

जीएसएमए मंडळाने गोपाल विठ्ठल यांची अध्यक्षपदी केली निवड

लंडन (दै. आरंभ पर्व)



जीएसएमएच्या संचालक मंडळाने गोपाल विठ्ठल यांची आगामी २०२७-२०२८ या मंडळाच्या कार्यकाळासाठी, डिसेंबर २०२८ पर्यंत, पुन्हा अध्यक्ष म्हणून निवड केली आहे. श्री. विठ्ठल १० वर्षांपासून जीएसएमए मंडळावर कार्यरत आहेत, ज्यात २०२५ पासून अध्यक्ष म्हणूनही ते काम पाहत आहेत. जीएसएमएचे अध्यक्ष या नात्याने श्री. विठ्ठल संस्थेच्या धोरणात्मक दिशेवर देखरेख करतात. ही संस्था जगभरातील मोबाइल सेवा कंपन्यांचे आणि व्यापक मोबाइल परिसंस्थेतील कंपन्यांचे प्रतिनिधित्व करते. जीएसएमए मंडळाने मार्गेरिटा डेला व्हॅले यांचीही सह-उपाध्यक्ष म्हणून निवड केली आहे. त्या राल्फ मुपिटा यांच्यासोबत असतील; मुपिटा यांची पुन्हा निवड झाली आहे.

"जीएसएमए मंडळाचा अध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा पुन्हा निवड झाल्याबद्दल मला सन्मान वाटतो. एक उद्योग म्हणून आपण एका नव्या युगात प्रवेश करत आहोत, ज्यात प्रगत नेटवर्क, एआय आणि खुले डिजिटल प्लॅटफॉर्म मोठे आर्थिक आणि सामाजिक मूल्य निर्माण करू शकतात. आमचे सर्वोच्च प्राधान्य सुरक्षा आहे. आजच्या वाढत्या धोक्यांमुळे देशांना सुरक्षित करणे, फसवणुकीच्या वाढत्या उपद्रवामुळे ग्राहकांना सुरक्षित करणे आणि उद्योगाला शाश्वत बनवून सुरक्षित करणे, जेणेकरून तो तंत्रज्ञानात पुढचा विचार करणारी गुंतवणूक करत राहील आणि जगाच्या सर्व भागांत सर्वोत्तम पायाभूत सुविधा उभारू शकेल. जीएसएमएची टीम आणि माझे सहकारी मंडळ सदस्य यांच्यासोबत हे महत्त्वाचे काम पुढे सुरू ठेवण्यास मी उत्सुक आहे. आमचे सह-उपाध्यक्ष राल्फ मुपिटा आणि मार्गेरिटा डेला व्हॅले यांच्यासोबत काम करण्यासाठीही मी उत्सुक आहे. हा अजेंडा पुढे नेताना त्यांचा अनुभव, भौगोलिक व्याप्ती आणि सखोल समज ही आमची मोठी ताकद ठरेल," असे गोपाल विठ्ठल म्हणाले. श्री. विठ्ठल हे भारती एअरटेलचे कार्यकारी उपाध्यक्ष आहेत.

महात्मा फुले वाडा आणि भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक समितीची अधिकृत वेबसाइट सुरू!

- **मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते वेबसाइटचे उद्घाटन**
- **महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त वर्षभर विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प**

पुणे (दै. आरंभ पर्व)

महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या ऐतिहासिक कार्याचा वारसा आधुनिक डिजिटल माध्यमातून जगभर पोहोचविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. महात्मा फुले वाडा व भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक समितीच्या अधिकृत वेबसाइटचे उद्घाटन राज्याचे ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भिडेवाडा राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे उपस्थित होते.



या वेबसाइटच्या माध्यमातून महात्मा फुले वाडा आणि भिडेवाड्याचा ऐतिहासिक वारसा, स्मारक समितीचे कार्य, विविध सामाजिक उपक्रम आणि महात्मा फुले दांपत्यांच्या विचारांची माहिती डिजिटल माध्यमातून नागरिकांना उपलब्ध होणार आहे. नव्या पिढीला या ऐतिहासिक स्थळांचा इतिहास आणि सामाजिक परिवर्तनातील योगदान समजावे, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश आहे.

दरम्यान, नुकतेच क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त युवा माळी मिशनच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या उपक्रमांच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. युवा माळी मिशनचे प्रमुख, युवासेना शहरप्रमुख तथा भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे यांनी हे पत्रक उपमुख्यमंत्र्यांना सुपूर्द केले.

'भिडेवाडा ते फुलेवाडा' अभियानातून एक लाख विद्यार्थ्यांना फुलेवाड्याची भेट घडविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासोबतच निबंध, वक्तृत्व, चित्रकला व प्रश्नमंजुषा स्पर्धा, पुस्तक प्रकाशन, विचारप्रबोधन व्याख्याने, शैक्षणिक साहित्य वाटप, 'मुलगी वाचवा, मुलगी शिकवा' आणि 'माझी शाळा सुंदर शाळा' यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

याशिवाय ३ जानेवारी २०२७ रोजी क्रांतीज्योती वुमन मॅरेथॉनचे आयोजनही करण्यात आले आहे.

भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाच्या कामाला गती देण्यासोबतच महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि परिवर्तनवादी विचारांचा प्रसार करण्यावर या अभियानात भर देण्यात येणार आहे. ऐतिहासिक वारसा जपण्यासोबतच तो डिजिटल माध्यमातून जगासमोर आणणे आणि फुले दांपत्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, या दुहेरी उद्देशाने समितीच्या वतीने सुरू करण्यात आलेला हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

पत्नीला 'मूर्ख' किंवा 'काही कामाची नाही' म्हणणे क्रूरता ठरत नाही

सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल



नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

पत्नीला 'मूर्ख' किंवा 'काही कामाची नाही' म्हणणे हा क्रूरता किंवा गुन्हेगारी स्वरूपाच्या धमकीचा गुन्हा ठरू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. पती-पत्नीमधील स्वभावातील मतभेद किंवा क्षुल्लक कारणांवरून होणारे वाद जर छळ किंवा शोषणाचा ठोस पुरावा नसेल, तर त्याला थेट गुन्हेगारीचे स्वरूप देऊ नये, असा इशाराही न्यायालयाने दिला आहे. टोरंटो (कॅनडा) येथील आपल्या अॅपार्टमेंटच्या २२ व्या मजल्यावरून उडी मारून जीवन संपवलेल्या एका महिलेच्या प्रकरणात, तिच्या पतीविरुद्ध सुरू असलेली फौजदारी कारवाई सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली. न्यायालयाने म्हटले की, एखाद्या जोडीदाराचा रागीट स्वभाव किंवा किरकोळ गोष्टींवरून ओरडण्याची सवय, म्हणजे आपोआपच 'गुन्हेगारी कृत्य' ठरत नाही किंवा त्या आधारावर संबंधित व्यक्तीला आत्महत्येसाठी जबाबदार धरता येणार नाही. पती आपल्या पत्नीला 'मूर्ख' किंवा 'निरुपयोगी' म्हणत असल्याचा आरोप प्रथमदर्शनी मान्य केला, तरी त्याचा समावेश क्रूरता किंवा गुन्हेगारी धमकीच्या गुन्ह्यात होऊ शकत नाही. अशा प्रकारचे वर्तन केवळ पतीच्या स्वभावाचे दर्शन घडवते.

हुंड्याचे आरोप फेटाळले

लग्नात आणि पहिल्या दिवाळीला दिलेल्या दागिन्यांना हुंडा मानण्यास न्यायालयाने नकार दिला. कौटुंबिक परंपरेनुसार दिलेल्या भेटवस्तू आणि हुंड्याची बेकायदेशीर मागणी यात फरक असल्याचे सांगत, न्यायालयाने विचारले की, छळ किंवा मागणी सुरू होती तर लग्नादरम्यान कोणतीही तक्रार का नोंदवली गेली नाही?

कॅनेडियन पोलीस अहवाल आणि इतर पुरावे

कॅनडा पोलीस आणि कॉर्प्स अहवालानुसार, अॅपार्टमेंटमध्ये कोणताही जबरदस्तीचा वा संशयास्पद प्रकार घडल्याचे दिसून आले नाही. घटना घडली तेव्हा पती घरात उपस्थित नव्हता; तो अर्ध्या तासानंतर परतल्याचे सीसीटीव्ही फुटेजवरून स्पष्ट झाले. तसेच, नोकरी न मिळणे आणि अभ्यासाचा ताण यामुळे ती मानसिक तणावात असल्याचे अहवालात नमूद होते.

न्यायालयाचा अंतिम निकाल

भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८अ (क्रूरता) आणि ५०४ (अपमान) च्या आवश्यक अटी या प्रकरणात लागू होत नाहीत, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल रद्दबातल ठरवला. ठोस पुराव्यांशिवाय पतीला आणि त्याच्या कुटुंबीयांना खटल्याला सामोरे जाण्यास भाग पाडणे हा कायद्याचा गैरवापर ठरेल, असे स्पष्ट करत न्यायालयाने पतीविरुद्धचा एफआयआर आणि पुढील सर्व कायदेशीर कारवाई पूर्णपणे रद्द केली.

न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने नमूद केले की, "अशा दुर्दैवी घटनेत मुलगी गमावलेल्या कुटुंबाचे दुःख आम्ही समजू शकतो. परंतु, पतीने किंवा त्याच्या नातेवाईकांनी पत्नीला आत्महत्येस भाग पाडणारे कोणतेही कृत्य किंवा निष्काळजीपणा केल्याचे सिद्ध झाल्याशिवाय, या दुर्घटनेचे संपूर्ण खापर त्यांच्यावर फोडले जाऊ शकत नाही." या प्रकरणातील जोडप्याचा विवाह जानेवारी २०२१ मध्ये झाला होता. काही काळ चंद्रपूर येथे राहिल्यानंतर ते फेब्रुवारी २०२२ मध्ये कॅनडात स्थायिक झाले. ११ जून २०२३ रोजी या महिलेने टोरंटो येथील २२ व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. तिच्याकडे सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये, तिला वर्षभरापासून नोकरी मिळत नसल्याची खंत आणि ती स्वतःला 'मूर्ख आणि निरुपयोगी' समजत असल्याचे लिहिले होते. महिलेच्या मृत्यूनंतर तिच्या वडिलांनी हुंडाबळी, क्रूरता, शारीरिक छळ आणि धमकी दिल्याचे आरोप करत मुंबई उच्च न्यायालयात एफआयआर नोंदवला होता. मुंबई उच्च न्यायालयाने हा एफआयआर रद्द करण्यास नकार दिला होता, ज्याविरोधात पतीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

थोडक्यात पण महत्वाचे



‘सनातन संस्थे’च्या साधकांच्या बेकायदेशीरपणे चौकशा चालूच !

पुणे (आरंभ पर्व) : गेल्या काही दिवसांपासून सनातन संस्थेचे साधक, हितचिंतक आणि जाहिरातदार यांच्या बेकायदेशीरपणे पोलीस चौकशा होत असल्याचे लक्षात आले आहे. पोलीस, पोलीस पाटील, सायबर शाखा आणि ‘एटीएस’चे अधिकारी असल्याचे सांगून सनातनच्या साधकांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावण्याची भीती दाखवली जात आहे. यात गंभीर म्हणजे या चौकशीतून नाव वगळण्यासाठी लाच देखील मागितली जात आहेत. सनातन संस्था आणि तिचे साधक यांचा कोणत्याही गुन्ह्यात दुरान्वयेही संबंध नसतांना अशा प्रकारे बेकायदेशीर चौकशा होणे, अत्यंत दुर्दैवी आणि अन्याय्य आहे. नेमक्या कोणत्या कारणांसाठी या चौकशा केल्या जात आहेत, खरंच पोलीस प्रशासन या चौकशा करत आहे कि काही भ्रष्ट वा सनातन विरोधी पोलीस अधिकारी यामागे आहेत, या दृष्टीने आम्ही महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकांची भेट घेतली. या अत्यंत गंभीर प्रकरणी त्वरित दखल घेऊन सामान्य कुटुंबातील साधना करणाऱ्या सत्त्वगुणी निष्पाप साधकांच्या चौकशा तत्काळ थांबवाव्यात, अशी मागणी महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकांकडे केली आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या पत्रकार परिषदेला हिंदु विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर, हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ते श्री. सतीश कोचरेकर हे देखील उपस्थित होते.

सुपरक्रॉस रेसिंग लीगच्या हंगामासाठी ‘वेगा हेल्मेट्स’ अधिकृत प्रायोजक

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील हेल्मेट आणि रस्ते सुरक्षा उपकरणांच्या निर्मिती क्षेत्रातील आघाडीचा ब्रँड असलेल्या ‘वेगा हेल्मेट्स’ने (Vega Helmets) ‘इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीग’च्या (ISRL) तिसऱ्या हंगामासाठी अधिकृत प्रायोजक आणि सुरक्षा भागीदार म्हणून भागीदारी जाहीर केली आहे. या सहकार्यामुळे भारतीय मोटरस्पोर्ट क्षेत्रातील सुरक्षिततेला प्रोत्साहन मिळण्याबरोबरच व्यावसायिक रेसिंग आणि सामान्य दुचाकीस्वारांमध्ये जबाबदार वाहन चालविण्याच्या संस्कृतीला चालना मिळणार आहे. चार दशकांहून अधिक काळ हेल्मेट निर्मिती आणि दुचाकीस्वारांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेली वेगा कंपनी आता देशातील वेगाने विस्तारत असलेल्या मोटरस्पोर्ट क्षेत्राशी जोडली गेली आहे. या भागीदारीअंतर्गत वेगा हेल्मेट्सकडून ISRL च्या तिसऱ्या हंगामातील सर्व रेस मार्शलना तसेच लीगच्या अधिकृत कम्युनिटी राइड्समध्ये सहभागी होणाऱ्या रायडर्सना आवश्यक सुरक्षा उपकरणे पुरविण्यात येणार आहेत. याशिवाय, लीगच्या अधिकृत कम्युनिटी रायडिंग उपक्रमांना कंपनीकडून सहकार्य केले जाणार आहे. या उपक्रमांमधून रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती करणे, हेल्मेट वापरण्याचे महत्त्व अधोरेखित करणे, जबाबदार वाहन चालविण्यास प्रोत्साहन देणे आणि देशातील मोटारसायकलिंग संस्कृतीमध्ये अधिकाधिक लोकांचा सहभाग वाढविणे, अशी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, सुपरक्रॉस रेसिंग हा मोटरस्पोर्टमधील अत्यंत आव्हानात्मक आणि जोखमीचा प्रकार मानला जातो. या स्पर्धांमध्ये रायडर्सना उंचवटे, तीव्र वळणे, अडथळे आणि वेगवेगळ्या प्रकारच्या ट्रॅकवरून अत्यंत वेगाने मोटारसायकल चालवावी लागते.

महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सुरेल जागर; माझी दिवाळी गीत रसिकांच्या भेटीला



पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचे, परंपरेचे आणि सण-उत्सवांचे दर्शन घडवणारा दिवाळीचा सण प्रत्येक घराघरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याच दिवाळीच्या आनंदोत्सवाला सुरेल संगीताची जोड देत लेखक - दिग्दर्शक रामकुमार शेडगे यांनी खास मराठमोळे दिवाळी गीत रसिकांच्या भेटीला आणले आहे. महाराष्ट्राच्या पारंपरिक दिवाळीचे मनोहारी दर्शन घडवणारे हे गीत सध्या रसिकांसाठी उपलब्ध झाले आहे. ‘तोरण मांगल्याचे बांधू दारी, चला रांगोळी काढू अंगणी। आली दिवाळी... अंगणी माझ्या, माझी दिवाळी...!’ अशा सुंदर आणि अर्थपूर्ण शब्दांनी सजलेल्या या गीतातून मराठी संस्कृतीचा गोडवा अनुभवायला मिळतो. घरासमोरील आकर्षक रांगोळ्या, दारावरील आंब्याच्या पानांची तोरणे, दिव्यांची रोषणाई आणि नात्यांमधील आपुलकी यांचे सुंदर चित्रण या गीतात करण्यात आले आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रात पारंपरिक पद्धतीने साजऱ्या होणाऱ्या वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, दिवाळी पाडवा, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज अशा विविध सणांचे सांस्कृतिक महत्त्व या गीतातून उलगडण्यात आले आहे. प्रवीण मेहंदी निर्मित आणि ‘द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स’ प्रस्तुत या गीताचे लेखन व दिग्दर्शन रामकुमार शेडगे यांनी केले आहे. संगीताची धुरा हर्षित अभिराज यांनी सांभाळली असून गायिका गायत्री शेलार आणि गायक हर्षित यांनी गीताला स्वर दिले आहेत. या गीतात प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड, हेमल इंगळे यांच्यासह प्रज्वल ओसवाल, प्रमोद ओसवाल आदी कलाकारांचा सहभाग आहे. नृत्यदिग्दर्शन सुजितकुमार यांनी केले आहे. प्रोडक्शन हेड कृष्णा साबळे तर असिस्टंट डायरेक्टर विक्रांत कुलकर्णी हे आहेत. हे दिवाळी विशेष गीत ‘द डार्क शॅडो मोशन पिक्चर्स’च्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर प्रदर्शित करण्यात आले आहे.

लेखणीच्या ताकदीने संपादकीय विश्वात उमटविला कर्तृत्वाचा ठसा!

ज्योती नाळे यांना ‘आदर्श महिला वृत्त संपादिका’ हिंदुरत्न पुरस्कार

- पुरुषप्रधान पत्रकारितेच्या क्षेत्रात महिला नेतृत्वाची दमदार मोहोर
- संपादकीय जबाबदारी, निर्णयक्षमता आणि सामाजिक बांधिलकीचा गौरव, ज्योती नाळे यांच्या कर्तृत्वाने नव्या महिला पत्रकारांना मिळाली प्रेरणा!



पुणे- प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)

पत्रकारितेच्या क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करणे हे आव्हानात्मक असते; मात्र त्याच क्षेत्रात संपादकीय जबाबदारीचे समर्थपणे नेतृत्व करत आपल्या लेखणीने समाजातील प्रश्नांना वाचा फोडणे, बातम्यांना योग्य दिशा देणे आणि पत्रकारितेचा विश्वास जपणे ही त्याहून मोठी जबाबदारी असते. ही जबाबदारी आपल्या कार्यक्षमतेने, अभ्यासपूर्ण दृष्टिकोनाने आणि सामाजिक बांधिलकीने समर्थपणे पेलणाऱ्या दैनिक संध्या व संध्या लाईव्हच्या वृत्त संपादिका सौ. ज्योती नाळे यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना ‘आदर्श महिला वृत्त संपादिका’ हिंदुरत्न पुरस्कार-२०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या या सन्मानाने महिला पत्रकारितेच्या कर्तृत्वाला नवी झळाळी मिळाली असून, पत्रकारिता क्षेत्रात पुढे येऊ इच्छिणाऱ्या महिलांसाठी हा सन्मान प्रेरणादायी ठरत आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त डॉ. मणिभाई देसाई मानवसेवा ट्रस्टच्या वतीने आयोजित विशेष पुरस्कार वितरण सोहळ्यात अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष रवींद्र साठे आणि ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे यांच्या हस्ते ज्योती नाळे यांना सन्मानचिन्ह व पुरस्कार प्रदान करण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

पत्रकारिता म्हणजे केवळ घडलेल्या घटनांचे वृत्तांकन नव्हे, तर समाजाच्या वेदना, अपेक्षा, प्रश्न आणि संघर्ष यांना प्रभावीपणे मांडण्याचे सामर्थ्य होय. ज्योती नाळे यांनी वृत्त संपादिका म्हणून हीच भूमिका आपल्या कामातून जपली आहे. कोणती बातमी महत्त्वाची, कोणत्या विषयाला प्राधान्य द्यायचे, समाजहिताच्या प्रश्नांना कोणत्या पद्धतीने वाचकांसमोर मांडायचे आणि वृत्तपत्राचा दर्जा कसा टिकवायचा, याची जाण त्यांच्या संपादकीय कार्यातून दिसून येते. बातम्यांची निवड, आशयपूर्ण संपादन, मथळ्यांची अचूकता, विषयांचे महत्त्व आणि वाचकांच्या अपेक्षांचा विचार करून वृत्तपत्राला दर्जेदार स्वरूप देण्याचे काम त्या प्रभावीपणे करीत आहेत. पत्रकार बांधवांशी समन्वय राखताना संपादकीय शिस्त आणि व्यावसायिकतेची सांगड घालणे, हे त्यांच्या कार्याचे विशेष वैशिष्ट्य आहे.

ज्योती नाळे यांनी या आव्हानांना सामोरे जात आपल्या कामातून संपादकीय नेतृत्व सिद्ध केले आहे. महिला असल्यामुळे कोणत्याही क्षेत्रातील जबाबदारी कमी होत नाही, उलट संधी आणि विश्वास मिळाल्यास महिला कोणत्याही क्षेत्रात समर्थपणे नेतृत्व करू शकतात, याचे उदाहरण त्यांच्या कार्यातून समोर येते. त्यांचा हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून महिला कर्तृत्वाचा आणि संपादकीय क्षेत्रातील महिला नेतृत्वाचा गौरव आहे. पत्रकारिता क्षेत्रात येण्याची इच्छा असणाऱ्या अनेक तरुणींसाठी ज्योती नाळे यांचा प्रवास महत्त्वाचा संदेश देणारा आहे. केवळ पद मिळविणे नव्हे, तर आपल्या कामातून विश्वास संपादन करणे, जबाबदारीचे भान राखणे, सातत्याने स्वतःला सिद्ध करणे आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी जपणे, हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव झाल्याने महिला पत्रकारांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच संपादकीय क्षेत्रात महिलांसाठी नव्या संधींचे महत्त्वही अधोरेखित झाले आहे.

> ‘आदर्श महिला वृत्त संपादिका’ हिंदुरत्न पुरस्कार हा ज्योती नाळे यांच्या आजवरच्या कार्याचा गौरव करणारा सन्मान आहे. मात्र, अशा पुरस्कारांमुळे केवळ आनंद किंवा प्रतिष्ठा मिळत नाही, तर समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक दृढ होते. पत्रकारितेतील विश्वासार्हता, निष्पक्षता, सामाजिक संवेदनशीलता आणि जनहिताच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची भूमिका अधिक सक्षमपणे पुढे नेण्याची प्रेरणाही मिळते. या पुरस्कारामुळे दैनिक संध्या व संध्या लाईव्हच्या संपादकीय कार्याचाही गौरव झाला आहे. ज्योती नाळे यांच्या या यशाबद्दल पत्रकारिता, सामाजिक आणि विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महिलेच्या हातातील लेखणी जेव्हा समाजाचा आवाज बनते, तेव्हा ती केवळ बातमी लिहीत नाही, तर परिवर्तनाची नवी दिशा निर्माण करते! ज्योती नाळे यांचा हा सन्मान म्हणजे अशाच कर्तृत्ववान महिला नेतृत्वाला मिळालेली दाद आणि उद्याच्या महिला पत्रकारांसाठी जिद्द, आत्मविश्वास व स्वाभिमानाची प्रेरणादायी मशाल आहे!

नव्या पिढीतील महिला पत्रकारांसाठी प्रेरणादायी आदर्श!

महिला नेतृत्वाची संपादकीय क्षेत्रात दमदार भरारी!

आज महिला प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची नवी उंची गाठत आहेत. राजकारण, प्रशासन, उद्योग, शिक्षण, विज्ञान आणि सामाजिक क्षेत्राप्रमाणेच पत्रकारितेच्या क्षेत्रातही महिला आपल्या बुद्धिमत्तेने, जिद्दीने आणि नेतृत्वक्षमतेने स्वतंत्र स्थान निर्माण करीत आहेत. मात्र, संपादकीय जबाबदारी सांभाळताना सातत्याने निर्णय घेणे, विविध विषयांचे आकलन ठेवणे, बातम्यांची विश्वासार्हता जपणे आणि संपूर्ण वृत्तांकन प्रक्रियेत समन्वय राखणे या जबाबदाऱ्या तितक्याच आव्हानात्मक असतात.

एमपीएससीच्या नऊ परीक्षांची चौकशी

पुणे (दै. आरंभ पर्व)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभारातील कथित गैरव्यवहारांची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या आयोगाच्या कामकाजाला अखेर गती मिळाली आहे. आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंडे यांनी नऊ परीक्षांच्या चौकशीसाठी पुरावे सादर करण्याचे परिपत्रक नुकतेच जारी केले आहे. मात्र, या नऊ परीक्षांच्या यादीत ‘राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५’ चा समावेश करण्यात आलेला नाही. विशेष म्हणजे, या परीक्षेच्या निकालातील गुणांच्या मूल्यमापनाबाबत विद्यार्थ्यांनी यापूर्वीच गंभीर आक्षेप नोंदविले आहेत. त्यामुळे इतर परीक्षांची चौकशी होत असताना ‘राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५’ला चौकशीच्या कक्षेबाहेर का ठेवण्यात आले, असा प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे. एमपीएससीच्या परीक्षांमधील कथित गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका आणि उत्तरतालिका फुटल्याची प्रकरणे तसेच आयोगाच्या कामकाजावर झालेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी माजी मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांचा चौकशी आयोग स्थापन करण्यात आला आहे. या आयोगाला ६० दिवसांत अहवाल सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. या धर्तीवर आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंढे यांनी जाहीर सूचना प्रसिद्ध केली आहे. यामध्ये चौकशीसाठी नऊ परीक्षांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या परीक्षांशी संबंधित व्यक्तींना १६ नोव्हेंबरपर्यंत प्रतिज्ञापत्रासह आपली निवेदने आणि उपलब्ध पुरावे सादर करता येणार आहेत. मात्र, या प्रक्रियेत ‘राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५’ चा उल्लेख करण्यात आला नाही.

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त पुण्यात १० हजार मुलींची भव्य मॅरेथॉन!

- भिडेवाडा ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा मार्ग
- 'क्रांतीज्योती वुमेन्स रन २०२७'च्या माध्यमातून स्त्रीशिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचा जागर



पुणे (दै. आरंभ पर्व)

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून पुण्यात महिलांसाठी विशेष मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ३ जानेवारी २०२७ रोजी होणाऱ्या 'क्रांतीज्योती वुमेन्स रन २०२७' मध्ये तब्बल १० हजार मुली आणि महिला सहभागी होणार आहेत. भिडेवाडा ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा या मॅरेथॉनचा मार्ग असणार आहे. भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येणारी ही स्पर्धा केवळ क्रीडा स्पर्धा नसून स्त्रीशिक्षण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांचा जागर करणारे व्यासपीठ ठरणार आहे. विशेष म्हणजे, महिलांसाठी स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येणाऱ्या या उपक्रमातून हजारो मुलींना एकत्र आणण्याचा प्रयत्न आहे. या मॅरेथॉनप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे उपस्थित राहणार असल्याची माहिती निलेश गिरमे यांनी दिली. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणासाठी केलेला संघर्ष, अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक समता आणि समाजप्रबोधनाचे कार्य आजच्या तरुण पिढीपर्यंत पोहोचविणे हा या मॅरेथॉनचा मुख्य उद्देश आहे. सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी सुरू केलेल्या ऐतिहासिक कार्याची माहिती नव्या पिढीला देण्याबरोबरच शिक्षणाचे महत्त्व समाजमनात रुजविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

> भिडेवाडा ही भारतातील स्त्रीशिक्षणाच्या क्रांतीची ऐतिहासिक भूमी आहे. याच भूमीतून सुरू झालेल्या शैक्षणिक परिवर्तनाचा संदेश घेऊन हजारो मुली पुणे विद्यापीठाच्या दिशेने धावणार आहेत. त्यामुळे ही मॅरेथॉन महिला सक्षमीकरणासोबतच फुले दांपत्यांच्या विचारांना अभिवादन करणारा ऐतिहासिक उपक्रम ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.
> **- निलेश गिरमे, अध्यक्ष, भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक समिती**

सरदार पटेलांसारखे युगपुरुष उदयाला येतात : ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे



पुणे (दै. आरंभ पर्व)

भारताच्या स्वातंत्र्यानंतर देशासमोर सर्वात मोठे आव्हान होते ते म्हणजे राष्ट्रीय एकात्मता आणि सार्वभौमत्व टिकविण्याचे. अशा निर्णायक काळात भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांनी आपल्या कणखर नेतृत्वातून, राष्ट्रनिष्ठेतून आणि दूरदृष्टीतून देशाच्या एकीकरणाचे ऐतिहासिक कार्य केले. त्यांनी स्वातंत्र्योत्तर भारतातील ५६५ हून अधिक संस्थानांचे भारतीय संघराज्यात यशस्वी विलीनीकरण करून अखंड भारताची पायाभरणी केली. राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होतो, तेव्हा सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारखे युगपुरुष नेतृत्व उदयाला येते, असे परखड प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक, प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे यांनी केले. पद्मश्री डॉ. मणीभाई मानवसेवा ट्रस्टच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती, राष्ट्रीय एकात्मता दिन आणि हिंदुरत्न पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात डॉ. भोळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती तथा राज्यमंत्री दर्जा असलेले रवींद्र साठे होते. डॉ. रवींद्र भोळे यांनी आपल्या भाषणात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्याचा आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचा सविस्तर आढावा घेतला. सरदार पटेल यांनी कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोगाच्या माध्यमातून राष्ट्राची समर्पित भावनेने सेवा केली. राष्ट्रासाठी यज्ञ, दान आणि तपश्चर्येच्या भावनेतून त्यांनी निष्काम कर्मयोग आचरणात आणला.

सत्ता किंवा व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेपेक्षा राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते, असे त्यांनी नमूद केले. स्वातंत्र्यानंतर देशात अस्तित्वात असलेल्या ५६५ हून अधिक संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करणे हे अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक कार्य होते.

हैदराबाद, जुनागड आणि काश्मीरसारख्या संस्थानांच्या प्रश्नांमुळे देशाच्या अखंडतेसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. मात्र, सरदार पटेल यांनी कणखर निर्णयक्षमता, मुत्सद्देगिरी आणि प्रसंगी लष्करी कारवाईचा निर्णय घेत भारतीय एकात्मतेला बळ दिले.

तरुणांनी पटेलांच्या विचारांचा आदर्श घ्यावा – रवींद्र साठे

कार्यक्रमाचे अध्यक्ष रवींद्र साठे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कणखर नेतृत्वाचा गौरव केला. देशातील विविध संस्थानांना एका सूत्रात बांधून भारताची एकता आणि अखंडता मजबूत करण्याचे महान कार्य सरदार पटेल यांनी केले. आजच्या तरुणांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व जपण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रीय एकात्मता दिन आणि हिंदुरत्न पुरस्कार वितरणासारख्या उपक्रमांमुळे समाजात राष्ट्रभक्तीची ज्योत तेवत राहते. विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान केल्याने सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ होते. डॉ. रवींद्र भोळे हे गेल्या ३० ते ४० वर्षांपासून विविध सामाजिक आणि सेवाभावी क्षेत्रांत सातत्याने कार्यरत असून, त्यांचे योगदान निश्चितच कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गारही साठे यांनी काढले.

बोगस दस्तऐवजांच्या आधारे ‘SRA’ची फसवणूक

विकसकावर गुन्हे दाखल करण्यासाठी उद्या येरवड्यातील नागरिकांचा भव्य 'निषेध महामोर्चा'

पुणे (दै. आरंभ पर्व)

जाधवनगर, येरवडा येथील नियोजित झोपडपट्टी पुनर्वसन (SRA) प्रकल्पाला स्थानिक नागरिकांनी व अधिकृत झोपडीधारकांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. संबंधित विकसकाने (मे. पश्चिम बिल्डर्स) स्थानिक नागरिकांच्या खोट्या व बोगस संमत्या मिळवून तसेच प्राधिकरणाकडे बनावट व बोगस दस्तऐवज दाखल करून एसआरए प्राधिकरणाची मोठी फसवणूक केल्याचा खळबळजनक आरोप नागरिकांनी केला आहे. या फसव्या प्रकल्पाच्या विरोधात आणि संबंधित बोगस विकसकावर तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी उद्या बुधवार, दिनांक ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता गणेशखिंड रोडवरील काकडे मॉल येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयावर एका भव्य 'निषेध महामोर्चाचे' आयोजन करण्यात आले आहे.

हा मोर्चा ज्येष्ठ नेते व माजी नगरसेवक ॲड. आयुबभाई शेख आणि रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येत आहे 'रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी' आणि 'SRA विरोधी कृती समिती, जाधवनगर' यांच्या संयुक्त विद्यमाने या आंदोलनाचे नियोजन करण्यात आले आहे. जाधवनगर येरवडा (स.नं. १५०, १५३ए, सि.स.नं. २७६२/२३, २७६२/२४, २७६२/२६, २७६२/४९) येथील मिळकतीवर प्रशासनाने उद्या (४ नोव्हेंबर) झोपड्यांचे सर्वेक्षण करण्याचे नियोजन केले असून त्यासाठी पोलीस बंदोबस्तही मागवला आहे. मात्र, हा संपूर्ण प्रकल्पच खोट्या कागदपत्रांच्या आणि फसवणुकीच्या पायावर उभा असल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे

नागरिकांनी या संदर्भात झोपुप्रा (SRA) चे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पोलीस उपायुक्त (परिमंडळ ४) यांना सविस्तर पत्र देऊन सदर वादग्रस्त सर्वेक्षण तातडीने स्थगित करण्याची मागणी केली आहे. बोगस कागदपत्रे सादर करणाऱ्या विकसकावर फौजदारी गुन्हा (FIR) दाखल होईपर्यंत आणि हा बेकायदेशीर प्रकल्प पूर्णतः रद्द होईपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार नेतृत्वाने व कृती समितीने व्यक्त केला आहे. उद्या निघणाऱ्या या निषेध महामोर्चामध्ये ५०० पेक्षा अधिक स्त्री-पुरुष नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी होणार असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळीच पावले उचलावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे.



दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

आपल्या जाहिरातींसाठी
विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व
सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती
आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये –
विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.

आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी



आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यत पोहोचवण्यासाठी
आजच संपर्क साधा!

संपर्क :
प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल :
aparvinfo@gmail.com

दैनिक आरंभ पर्व | "आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र"